विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | श्री. अचलकुमार टिल्लू |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००० |
| वर्ष | : | चौथे |
| अंक | : | ७ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**


**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ३३**

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा

वर्ष चौथे / अंक ७ / जानेवारी २०००



## संपादकीय

### नवीन इसवी सनाचे स्वागत

२०वे शतक जाण्याच्या उंबरठ्यावर असताना मनात काही संमिश्र भावना आहेत. एकतर विसाव्या शतकातील जवळ जवळ स्वातंत्र्यानंतरचा सर्व काळ याचि देहा याचि डोळा अनुभवला आहे. तेव्हा शंभर वर्षांपैकी जाण आल्यावर ५५ वर्षातील इतिहास सलग माहीत आहे. त्या आधीचा इतिहास शाळा/महाविद्यालयातील इतिहासाच्या वा वाङमयाच्या अल्प वाचनाने माहीत झाला आहे. गेल्या शतकातील विशेषतः स्वातंत्र्या नंतरच्या काळातील प्रत्येक चांगल्या वाईट घटनेचे साक्षीदार अजून मी व माझ्या सारखे अनेक या कालखंडात जन्मल्यामुळे स्वतःला सुदैवी समजत असतील. या कालखंडात आम्ही उत्तुंग प्रतिभेची व कीर्तीमान माणसे बघितली. त्या प्रमाणे दुसरे व्यक्तिमत्त्व निपजणे नाही.उदाहरणे घ्यावयाची झाली तर ती अनेक आहेत. योगी अरविंद, नेताजी सुभाषचंद्र बोस, बाळ गंगाधर टिळक, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरु ही राजकीय तर बाल गंधर्व, अब्दुल करीम खाँ, प. सामता प्रसाद, गायन हिरा हिराबाई बडोदेकर, गान तपस्विनी मोगुबाई कुर्डीकर, सवाई गंधर्व, शहनाई नवाज बिस्मिल्ला खाँ, भारत रत्न एम्.एस्. सुब्बलक्ष्मी, गानकोकिळा लता मंगेशकर त्यांच्या भगिनी श्रीमती आशा भोसले, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे खेळाडू हॉकीपटू ध्यानचंद, धावपटू मिल्खासिंग, रणजित सिंह, निस्सार, सी.के. नायडू, विजय मर्चंट, विजय हजारे, सुनील गावस्कर, कपिल देव, सचिन तेंडुलकर, पं. भीमसेन जोशी, सौ. किशोरी अमोणकर, पं. रवि शंकर वगैरे. हे एकेक व्यक्तिमत्व म्हणजे संस्थाने होती व आहेत. इतका त्यांचा कार्याचा व्याप होता व आहे. अखंड काम , जिद्द या जोरावर या व्यक्तींनी नाव

कमविले. शून्यातून आपले विश्व निर्माण केले. मा. पु.ल. देशपांडे, ना.सी. फडके, भाऊसाहेब खांडेकर,ग.दि. माडगूळकर, कवी प्रदीप, कुसुमाग्रज, डॉ. सुमती क्षेत्रमाडे, चिं.वि. जोशी, शि.म. परांजपे, नाटककार किर्लोस्कर, बल्लाळ, देवल, राम गणेश गडकरी, कृ.प्र. खाडिलकर, वगैरे असंख्य लेखक, कवी यांचे वाङ्मय वाचण्यास मिळाले.

सत्यजित रे, तपन सिन्हा, व्ही. शांताराम, राजकपूर, गुरुदत्त यांसारखे आंतरराष्ट्रीय किर्तीचे दिग्दर्शक यांच्या कलाकृतींने डोळ्यांचे पारणे फेडले.

जयंत नारळीकर, जगदीश चंद्र बोस, रामन, डॉ. भाभा वगैरे वैज्ञानिक व त्यांचे कार्य याचि देहा याचि डोळा बघण्यास मिळाले व त्यातील आणखी एक भाग्याची गोष्ट म्हणजे गेल्यावर्षीच्या अणूउर्जा स्फोटाने आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय वैज्ञानिकांनी आपल्या कौशल्याची महती पटवून दिली. त्या अणु उर्जा विभागाच्या आर्यभटची तयारी होत असताना व त्यानंतर जवळ जवळ ३५ वर्षे त्या कार्यालयात काम करण्याचा व डॉ. भाभा, डॉ. साराभाई, डॉ. सेठना, डॉ. रामण्णा व आताचे डॉ. चिदंबरन व डॉ. अनिल काकोडकर या सारख्या व्यक्तींशी प्रत्यक्ष संपर्क आला व त्यांचे कार्य बघता आले. जगाच्या उंबरठ्यावर अशीच उतुंग व्यक्तिमत्वाची माणसे होऊन गेली.

असं हे एकोणीसावे शतक पार करताना सन २००० कसे असेल या बद्दल ही नकळत हुरहुर आहे. मला वाटते प्रत्येकाची स्थिती कमी जास्त प्रमाणात याहून वेगळी नाही.

दुसरे महायुद्ध, भारताचे स्वातंत्र्य, भारताचे प्रजासत्ताक होणे. भारताच्या शेर्पा तेनसिंगने गौरीशंकर शिखरावर पहिले पाऊल ठेवणे. मानवाचे चंद्रावर उतरणे, भारताला ऑलिंपीकमध्ये कुस्तीत, हॉकीत सुवर्णपदक मिळणे. भारताची वेस्ट इंडिजवर क्रिकेटमधे त्याच्या देशात मात. इंग्लंडमध्ये भारताचा पहिला विजय, भारताचा पहिला अणु ऊर्जा स्फोट, त्या आधी चीन व पाकिस्तान बरोबरची युद्धे, पाकिस्तानची शकले, बांगला देश युद्ध, भारताचा पहिला उपग्रह आर्यभट्ट, त्यानंतर सोडलेले उपग्रह. त्या संबंधात केलेली प्रगती, संगणक युगात भारताची प्रगती, इलेक्ट्रॉनिक्स् मध्ये भारताची प्रगती, दुसरा अणुस्फोट, रविंद्र नाथ टागोरांनंतर, भारताच्या मदर टेरेसा यांना मिळालेले नोबेल पारितोषिक, नंतर अर्थशास्त्राबद्दल अमर्त्य सेन यांना मिळालेले नोबेल पारितोषिक, दुसरा अणुस्फोट या सर्व उतुंग घटनेचे आम्ही साक्षीदार आहोत.

सर्वांना नववर्षाच्या शुभेच्छा!

अचलकुमार टिल्लू
*संपादक*

• • •

With Best Compliments from

A
WELL
WISHER

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा



वर्ष चौथे / अंक ७ / जानेवारी २०००

**संपादक**
श्री. अचलकुमार टिल्लू
**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक
**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर
**सहाय्यक मंडळ**
प्रा. संतोष राणे
सौ. भारती जोशी
सौ. मंगला घाटणेकर
सौ. मनाली देवधर
सौ. विशाखा देशपांडे
श्री. संजय वोरकर
सौ. विनोदिनी राणे
सौ. सुलक्षणा पाध्ये
कु. दीपाली भाटकर
कु. सुंगधा चव्हाण
**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२ ६२७
**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्ट्स,
नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - १.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. अचलकुमार टिल्लू | |
| २) | कादंबरीकार खांडेकर | श्री. चंद्रशेखर बाय | ३ |
| ३) | विख्यात तबलावादक भाई गायतोंडे यांच्याशी झालेल्या गप्पा | सौ. मनाली देवधर<br>सौ. वीणा जोशी, श्री. संजय वोरकर | १३ |
| ४) | माहितीचे तंत्रज्ञान आणि शिक्षण | श्री. अनिल शाळीग्राम<br>श्री. प्रशांत देशपांडे | १८ |
| ५) | सौरभ चुबे-आमचा अभिमान विषय | शीतल हळदवणेकर,<br>अल्पना गुप्ते, मानसी बापट, प्रिया मराठे | २३ |
| ६) | मेघदूत-एक रसास्वाद | प्रा.(सौ.) सुनीता खरे | २५ |
| ७) | दत्तसंप्रदाय आणि उपासनामार्गाचे ध्येय | सौ. ज्योती जोशी | २९ |
| ८) | कुमार कला केंद्र | श्री. मनोज गडनीस | ३३ |
| ९) | परिसर वार्ता | सौ. विशाखा देशपांडे | ३७ |


सुविचार संकलन :
प्रा. मोहन पाठक यांनी केले आहे.

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी विद्याप्रसारक मंडळ तसेच संपादक सहमत असतीलच असे नाही.

# कादंबरीकार खांडेकर

सौ. मंजिरी दांडेकर

*(भाऊसाहेब खांडेकर ! काळाच्या ओघात नवीन पिढ्यांनी पुन्हा ओळख करून घ्यावे असे नाव. या महिन्यात भाऊसाहेबांची जयंती. त्या निमित्ताने त्यांचा परिचय. - संपादक)*

भारतीय ज्ञानपीठाचे लाखाचे पारितोषिक लाभलेले पद्मभूषण वि. स. तथा भाऊसाहेब खांडेकर यांच्या वाङ्मयाने मराठी साहित्यसृष्टीत एक स्वतंत्र युगच निर्माण केले आहे. विचाराने बलशाली, प्रतिभेने संपन्न आणि कल्पनेने कुबेरालाही लाजवावे असे त्यांचे लेखन आहे. जीवननिष्ठा आणि वाङ्मयनिष्ठा या दोन प्रेरणा खांडेकरांच्या ठिकाणी अतिशय प्रबळ होत्या. माणसाच्या ठिकाणी असलेली माणुसकी जागृत करण्याचे कार्य त्यांच्या साहित्याने केले.

**अल्पपरिचय** - वि.स. खांडेकर यांचा जन्म ११ जानेवारी १८९८ रोजी सांगली येथे झाला. घरची परिस्थिती बेताची म्हणून ते मॅट्रिक झाल्यावर त्यांच्या चुलत्यांनी त्यांस दत्तक घेतले. पुढचे शिक्षण पूर्ण करायचे असे ठरले. पण तो काळ स्वातंत्र्यपूर्व चळवळीचा, भारत ढवळून काढणारा काळ होता. महात्माजींनी 'खेड्याकडे चला' ही हाक तरुणवर्गास दिली. त्यांचा शब्द म्हणजे परवलीचा शब्द मानला जात असे. भाऊंनी ती हाक ऐकली आणि ते शिरोड्यात दाखल झाले. १९२० साली स्वार्थत्यागपूर्वक ज्ञानदानद्वारा समाजसेवा करण्याच्या हेतूने शाळा काढली आणि मासिक वीस रुपये पगार घेऊन दारिद्र्याशी झगडत शाळा ध्येयनिष्ठेने चालवली. याचे प्रतिबिंब त्यांच्या कादंबऱ्यात दिसते.

**लेखनाची सुरुवात** - भाऊ शाळेत असताना जरी त्यांच्या लेखनाची सुरुवात झाली असली तरी त्यांचे महाविद्यालयीन जीवन व शिरोडे येथील जीवन या काळातच लेखनबीजे अधिक रुजली. खांडेकरांच्या साहित्यावर श्री. कृ. कोल्हटकरांचे संस्कार दिसतात. कोल्हटकरांना ते गुरु मानत. कोल्हटकरांचा मानसपुत्र नाट्याचार्य गडकरी यांनी भाऊंची प्रशंसा केली.

साहित्याच्या सर्व वाङ्मयप्रकारात सकस आणि भरघोस असे लेखन त्यांनी केले. कथा, कादंबरी, लघुनिबंध, नाटक, कविता या साऱ्या वाङ्मयप्रकारांमधे त्यांचे व्यक्तिमत्त्व ठसठशीत प्रकटले आहे. आपण मुख्य विचार करणार आहोत तो त्यांच्या कादंबऱ्यांचा.

कोल्हटकर, गडकऱ्यांच्या शैलीचा परिणाम, आगरकरांचा सुधारणावाद, हरिभाऊ आपट्यांची जीवनदर्शी दृष्टी या तीन गोष्टींच्या संघटित परिणामातून, मनोवृत्तीचा आणि जीवन धारणेचा विशिष्ट आदर्श मनाशी बाळगून खांडेकरांनी आपले कादंबरी वाङ्मय लिहिण्यास आरंभ केला. त्यांच्या कादंबरीलेखनाला १९३० साली सुरुवात झाली. त्यांनी (१) हृदयाची हाक (१९३०), (२) कांचनमृग (१९३१), (३) उल्का (१९३४), (४) दोन ध्रुव (१९३४), (५) दोन मने (१९३८), (६) हिरवा चाफा (१९३९), (७) रिकामा देव्हारा (१९३९), (८) सुखाचा शोध (१९३९), (९) पांढरे ढग (१९३९), (१०) पहिले प्रेम (१९४०), (११) जळलेला मोहर (१९४१), (१२) क्रौंचवध (१९४२), (१३) अश्रू (१९५३), (१४) ययाति (१९५९), (१५) अमृतवेल (१९६७) अशा सामाजिक, राजकीय पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तिचित्रणात्मक १५ कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या अनेक कादंबऱ्यांची अनेक

भारतीय भाषांमधे भाषांतरे झाली. खांडेकरांची भाषाशैली अत्यंत आकर्षक निसर्गवर्णने, पत्रे यांनी युक्त अशी आहे. उपमा, अलंकार आणि जीवनातील बहुमोल सिद्धांत सांगणारी सुभाषिते हेही त्यांच्या कादंबऱ्यांचे वैशिष्ट्य आहे.

फडके, खांडेकर हे समकालीन कादंबरीकार. महाराष्ट्रात त्यावेळी 'कलावाद' आणि 'जीवनवाद' असा दोन पक्षांचा बोलबाला होता. फडक्यांनी कलावादाचा आविष्कार केला तर खांडेकरांनी कला जीवनासाठी असल्याबद्दल ठाम निर्वाळा दिला व अखेरपर्यंत ते त्या तत्त्वाला जागले. फडक्यांची कादंबरी फार मोठ्या प्रमाणात, अल्पावधीत लोकप्रिय झाली, हे खरे. कदाचित तत्कालीन मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय माणसाचा वास्तव जीवन स्वीकारण्यामागील मानसिक कमकुवतपणा हे एक कारण असू शकेल असे वाटते. खांडेकरांचे मन हळवे आहे. त्यांची संवेदनक्षमता तरल आहे आणि त्यांची सहानुभूती व्यापक आहे. विशेषतः १९२५ नंतर महाराष्ट्रीय जीवनावर परिणाम करणारी तत्त्वज्ञाने आणि महाराष्ट्रीय जीवनातील प्रक्षोभक घटना यांचा काही तरी समन्वय लावून त्यातून एक कलात्मक जग कल्पनेने निर्माण करावे अशी त्यांची उत्कट प्रेरणा आहे. त्यांचे समाजावरील प्रेम आणि तो सुधारावा याबद्दलची भावनात्मक तळमळ या गोष्टी अगदी पहिल्या प्रतीच्या कथालेखकाला शोभतील इतक्या प्रामाणिक आहेत. पण या साऱ्या गोष्टींना सूत्रबद्धता आणि संगती उत्पन्न करून देतांना वास्तवातील विचारदर्शन आणि कल्पकता प्रधान कल्पित सृष्टी यांच्या मिश्रणाचे रसायन असे काही वेगळे बनते की त्याचे पुन्हा पृथक्करण करताना वास्तवता आणि कल्पकता यांच्या घटकांची अदलाबदल होते. खांडेकरांनी आपल्या कादंबऱ्यांतून कामगारांचे संप, कायदेभंगाच्या चळवळी इ. साक्षात् राजकीय जीवनात भासणाऱ्या गोष्टी घेतल्या आहेत. त्यांची प्रकृती सामाजिक सुधारणेतील समस्यांशी भिडण्यात समरसता पावते. त्यांची मनोवृत्ती कवीची आहे. त्यावेळच्या सामाजिक जीवनातील असाफल्याच्या जाणिवेची बूज खांडेकरांनी राखली. फडक्यांच्या काळात खांडेकर लोकप्रिय झाले त्याचे कारण हेच दिसते. 'दोन ध्रुव' मधील परित्यक्ता कृष्णा, 'उल्के'तील ध्येयवादी दरिद्री शाळामास्तर भाऊ, 'हिरवा चाफा' मधील कामगार जीवनाशी समरस होणारा मुकुंद कांबळी, 'दोन मने' मधील ध्येयवादी श्री., पांढरे ढग' मधील गांधीवादातील ध्येयदर्शित्व आणि समाजवादातील प्रतिनिधित्व यांची प्रचिती पटविण्यासाठी धडपडणारा दिनकर आणि 'अश्रू' मधील आजच्या अन्याय्य शोषणाच्या काचाने आणि वाणिज्य वृत्तीतील नफेबाजी, लाचलुचपत आणि लबाडी यांच्या अनैतिक व अधःपतित सामाजिक मूल्यांनी गांजलेला प्रामाणिक शिक्षक व त्याचे ऋणानुबंधी आप्त यांच्या चित्रणात खांडेकरांच्या आवेश सुलभ कविमनाने समाजातील एका विशिष्ट वस्तुस्थितीचे चित्रण केले. फडक्यांच्या सुखवादी पात्रांशी या पात्रांनी विरोध आरंभिला आणि वाचकांना त्यामुळे खांडेकरांमधील हा जीवनाभिमुखतेचा गुण जाणवला. खांडेकरांची लोकप्रियता याच एका कारणात प्रामुख्याने साठविलेली आहे. खांडेकरांचा वाङ्मयीन व्यासंग, वैचारिक आवाका ध्येयवादाचा पुरस्कार करणारी वृत्ती आणि भावनाशीलता या गुणांचा आविष्कार त्यांच्या सर्वच कादंबऱ्यात दिसून येतो. 'दोन ध्रुव' मधील कथानकात कला आणि जीवन या जोडीचे चित्रण फडके आणि खांडेकर यांच्या भूमिकेतील विरोधाचे प्रतिबिंब आहे. या दोघांच्या जीवन दृष्टीकोनातील विरोध, कलेच्या संदर्भात स्वीकारलेल्या भिन्न भूमिका एकाच काळात महाराष्ट्रात दिसत होत्या. खांडेकरांच्या लोकप्रियतेसाठी त्यांचे कोणते सामर्थ्य कारणीभूत झाले याचा विचार करू.

**कादंबऱ्यांचा साधारण परिचय :**

खांडेकरांची पहिली कादंबरी 'हृदयाची हाक' प्रसिद्ध झाली. माणसाला आयुष्यात वेगवेगळ्या हाका ऐकू

येतात. प्रेमाची, सत्तेची, ज्ञानाची, पैशाची पण आपले जीवन सुखाचे करावयाचे असेल तर माणसाने प्रेमभावनेकडे लक्ष दिले पाहिजे, असा संदेश या कादंबरीने दिला. सर्वसामान्य गरीब माणसाच्या जीवनात जो आनंद भरलेला असतो, तो आनंद किंवा ती तृप्ती कैक पटींनी श्रीमंत असलेल्या माणसाच्या जीवनात लाभत नाही असे चित्र या कादंबरीत आहे. सुरुवातीच्या या कादंबरीत बरीचशी कृत्रिम भाषाशैली व निवेदनाची पद्धत एकसुरी आहे असे जाणवते. या कादंबरीत खांडेकरांनी तीन तरुण जोडपी निवडली आहेत. त्यांच्या जीवनाचे धागेदोरे गुंफण्यासाठी खून, अपघात, विषप्रयोग इ. रोमांचकारक प्रसंगांच्या गाठीही दिल्या आहेत. पण साऱ्या पात्रांच्या मुखातून एकटे एक खांडेकरच बोलत आहेत असे वाटते. त्याच व्याख्यानबाजीच्या वाचटळी उठल्या आहेत. त्यामुळे या कादंबरीला पहिलेपणाशिवाय दुसरे फारसे महत्त्व नाही.

या कादंबरीच्या प्रसिद्धीनंतर चारच महिन्यांनी 'कांचनमृग' ही त्यांची दुसरी कादंबरी प्रसिद्ध झाली. आपल्या काव्यमय कल्पनांनी ही कादंबरी नटविण्याचा प्रयत्न खांडेकरांनी केला आहे. त्यात जिव्हाळाही भरपूर आहे. लेखकाच्या जीवनाचे चित्र त्याच्या साहित्यात उमटते हा सिद्धांत जर मानला तर ही कादंबरी म्हणजे खांडेकरांच्या आत्मचरित्राचा एक खंडच आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. एम्.ए. झालेला सुधाकर प्रोफेसरी झिडकारून खेड्यात शाळा काढतो. राष्ट्रसेवेचा प्रारंभ करतो. खुद्द खांडेकरांनी शिरोड्यास शाळा चालवावयास घेतली होती. गावगुंडांचा इतका कटु अनुभव सुधाकराला येतो की त्याला काही काळ सगळीकडे निराशेचा अंधारच दिसतो. पण 'खरा शिक्षक म्हणजे उत्कृष्ट मूर्तिकार. दगडातून देव निर्माण करण्याचे कौशल्य साध्य करण्याकडे त्याचे सारे लक्ष असले पाहिजे.' हा विचारच सुधाकराच्या मनात स्थिरावतो.

याच कादंबरीत विधवांच्या उद्धाराचा विषयही खांडेकरांनी ठळकपणे रंगविला आहे. 'पण लक्षात कोण घेतो' प्रमाणेच तरुण विधवेचे केशवपन हा याही कादंबरीचा उत्कर्ष बिंदू आहे. केशवपनाची सुधावर सक्ती होणार या क्षणापासूनच कथानकात क्रांती होते आणि सुधाचा सुधाकराशी विवाह होतो. सुधाचा सासरा संन्यासी होऊन अधून मधून प्रगटतो आणि सत्यपक्षाला सहाय्य करतो या कथानकाचे मूळ कथानकावर कलम करून भाऊंनी अद्‌भूत रसही या कादंबरीत खेळविला आहे.

हरीभाऊंप्रमाणे नव्या नव्या म्हणीही या कादंबरीत खांडेकरांनी पुष्कळच पेरल्या आहे. उदा. 'बायकांची हाव म्हणजे कागदाची नाव', 'जिथे पैका तिथे धोका', 'राबणारांना धत्तुरा, इतरांना मानाचा तुरा'. स्वकीय संस्कृतीचे स्मरण करून देणारे पौराणिक दाखलेही पुष्कळ ठिकाणी आले आहेत. मूळ कादंबरीचे नावच पौराणिक कथेतून आले आहे. त्याचा आशय व्यक्त करताना खांडेकर म्हणतात, 'सीतेचे हरण करण्याकरता मारिचाने कांचनमृगाचे रूप घेतले. सीता त्याला भुलली आणि रामाला मुकली. आपल्या सर्वांच्या आयुष्यात अशीच फसगत होते. लहानपणी आळस भुलवतो, तारुण्यात रुप आणि पैसा याची भूल पडते, म्हातारपणी दगडाच्या देवांना संतुष्ट केले की सर्व पापे धुऊन निघाली असे माणसाला वाटते. पण खरं सुख आळसात नसून उद्योगानं संपादन केलेल्या विद्येत आहे. पैशात नसून परोपकारात आहे.

खांडेकरांच्या कादंबरीलेखनाचे वैशिष्ट्य जाणवेल ते असे की या लेखनात जागोजाग येणारी सुंदर नटलेली सुभाषिते. उपमा आणि सुभाषिते ही जणू त्यांचा श्वासोच्छवासच होती. उदा. समुद्राच्या लाटांचा आवाज त्यांना लपंडाव खेळताना लपायला जाणाऱ्या चिमुकल्या बालिकांच्या खिदळण्यासारखा वाटतो, रातांधळ्याला जसे उजाडल्याशिवाय दिसत नाही, तद्वतच रागाने आंधळ्या झालेल्या माणसाचा राग ओसरल्यावरच त्याच्याशी युक्तिवाद करावा. पाखरांची चपलता, प्रातःकालची सौम्य उज्ज्वलता, निर्झराचा खळखळाट यांचा त्रिवेणी संगम त्यांना

बालकांमधे दिसतो.

अशा प्रकारची असंख्य रमणीय व मधुर भाष्ये 'कांचनमृग' मधे आढळतात. इतर कादंबऱ्यांतूनही ती येत राहतात. लहान बालकाचे वर्णन, आईच्या वात्सल्याचे मनोज्ञ दर्शन निसर्गातील विविध प्रकारच्या रमणीय दृश्यांचे चित्र या कादंबरीत आहे. साधा पाऊस! पण त्यावर लढाईचे रुपक खांडेकर कसे चढवतात पहा. 'आकाशात युद्धाचा नगारा वाजला, लगेच काळी चिलखते घातलेले मेघसैनिक इकडे तिकडे फिरू लागले. त्यांनी रणदुंदुभी वाजवून निशाण मधूनच फडकावण्याला सुरुवात केली. त्या मेघांना भिऊनच की काय वारा पृथ्वीवर पळत आला. प्रीतीप्रमाणे भीतीही सांसर्गिक असल्यामुळे भयभीत वायूचा स्पर्श होताच झाडेही थरथर कापू लागली. आकाशाच्या बागेत फुललेल्या तारकापुष्पांचा मेघांनी केव्हाच चेंदामेंदा केला होता. थोड्याच वेळात त्यांनी शरवृष्टी आरंभिली आणि पावसाच्या सरीवर सरी कोसळू लागल्या.

अशीच अलंकारीक भाषा नायक-नायिकांपासून मोटार ड्रायव्हर व कारखान्यातील कामकरणी येथपर्यंत सर्वांच्या तोंडी आहे. त्यामुळे पात्रांतील स्वाभाविकता उणावली आहे. पण समाजाविषयी व्यापक दृष्टीने विचार करण्याची शिकवण ही कादंबरी वाचकाला देते आणि तीही काव्यपूर्ण कल्पनेच्या व रसपूर्ण भावनेद्वारे.

उल्का ही खांडेकरांची तिसरी आणि त्यांना स्वतःला आवडलेली कादंबरी. उल्का ही एका खेड्यातील शाळामास्तराची मुलगी. राष्ट्रसेवा करण्याच्या बुद्धीने खेड्यात वीस रुपयांवर शिक्षकी करणारे ध्येयवादी भाऊ हे पुन्हा खांडेकरांचेच प्रतिबिंब. सरस्वतीची सेवा करण्यासाठी लक्ष्मीकडे पाठ फिरविल्यामुळे भाऊंना (उल्काच्या पित्याला) अनेक संकटे सोसावी लागतात. त्यामुळे क्वचित निराशेचे, पश्चातापाचे झटके त्यांना येतात. पण त्यांचा स्वभाव धीरोदत्त आहे. आत्म्याचे लग्न जनसेवेशी लावण्याची ओढ त्यांना आहे. ते गडकऱ्यांचे मित्र आहेत. त्यांच्या कविताही कादंबरीतून मधून मधून दिल्या आहेत. काही रूपक कथाही कथा सूत्रात समाविष्ट केल्या आहेत. दोन-तीन पानांची पत्रेही बरीच आहेत. ही कादंबरी म्हणजे उल्काचे आत्मचरित्र आहे. हरिभाऊंच्या 'पण लक्षात कोण घेतो' मधे यमुना आपली कहाणी सांगते तशी खांडेकरांची उल्का आत्मवृत्त निवेदन करते. पण दोघींच्या भाषेत फरक आहे. यमुनेची भाषा कोटिबाज व अलंकारयुक्त आणि प्रसंग प्रेमाच्या ठरीव ठशाचे. तथापि खांडेकरांच्या इतर कोणत्याही कादंबरीपेक्षा उल्केतील पात्रांचे स्वभाव लेखन ठसठशीत आहे. त्यामुळे ती पात्र जिवंत वाटू लागतात आणि त्यांच्या सुखदुःखांशी वाचक समरस होऊ लागतो.

उल्केचे कथानक थोडक्यात असे की, उल्केवर वसंतराव व माणिकराव हे दोघेही तरुण प्रेम करतात. पण या दोघांशीही तिचे लग्न होत नाही. माणिकरावाने परदेशी जाऊन विशिष्ट प्रकारचे तांत्रिक शिक्षण घेतलेले आहे. पण सामाजिक निष्ठेची जाणीव त्याच्यात नाही. 'या क्रांतीकारकांइतके देशाचे नुकसान दुसऱ्या कोणीही केलं नसेल' असे त्यांचे ठाम मत आहे. उल्केबरोबर प्रणयलीला करून अखेर तिच्याशी विवाह करण्यास मात्र तो नकार देतो. वसंताशी होणारा विवाह पूर्वीच मोडलेला आहे. प्रणयभंगाने होरपळलेली उल्का, अखेर श्रीमंत बिजवराच्या गळ्यात माळ घालते. अखेर पैसा श्रेष्ठ ठरतो. माणिकराव धनिकांच्या वेगळ्याच विश्वात प्रवेश करतो. वसंताला श्रीमंत मुली सांगून येत असतात. म्हणून त्याने उल्केला नाकारलेले असते. या मुख्य कथानकाच्या आजूबाजूला दुय्यम पात्रांचे गौण प्रसंग रेखाटले आहेत. चंद्रकांत हा उल्केचा बालमित्र. तो मजुरांच्या वस्तीत काम करतो. त्याच्याशी उल्केचा विवाह होत नाही. पण त्याचे मन मात्र अखेरपर्यंत तिच्या सोबत असते. चंद्रकांत हा कादंबरीच्या उत्तरार्धात जयवंत शिरोडकर म्हणून वावरतो. भाऊसाहेबांचा ध्येयवाद चंद्रकांताच्या जीवनात पुरेपूर रुजलेला आहे. हे

---

आपल्या अपत्याचे मंगल चिंतणारे मन फक्त आईजवळच असू शकते.

कादंबरीतील अनेक घटनांवरून लक्षात येते. कारण तो पुढे स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतो, क्रांतिकारक बनतो. शांतिनिकेतन मधे काम करतो. आपल्या तत्त्वांशी एकनिष्ठ राहून तो कार्य करीत रहातो.

इतक्या सगळ्या परिस्थितीत उल्काच्या नवऱ्याचा गावकऱ्यांकडून नाश होतो. मग त्यानंतर मात्र उल्केला स्वतःचे कर्तृत्व दाखविण्याची संधी मिळते. तिच्या वडिलांनी पडविलेल्या संस्कारानुसार, आदर्शानुसार वागण्याचा ती प्रयत्न करते.

या कादंबरीत असलेल्या विविध व्यक्तिरेखा खांडेकरांनी अतिशय सजीव रेखाटल्या आहेत. उल्केच्या जीवनाबरोबरच मध्यमवर्गीय जीवनाचे विविध स्तरांवरचे चित्र यात स्पष्टपणे आले आहे. एकाच मध्यमवर्गीय परिस्थितीतून पुढे आलेले बसंत आणि माणिकराव हे परस्परांचे शत्रू म्हणून कसे येतात याचे चित्रण करताना एक समाजवादी सूत्र लेखकाने त्यात गुंफले आहे. गांधीजींचा सत्याग्रह, मीठाचा कायदेभंग इ. सारख्या वास्तव परिस्थितीचे दर्शन त्यात घडविले आहे. चंद्रकांत व उल्का हे दोघेही विचाराच्या दृष्टीने समपातळीवर येणारे. ध्येयवादाला मानणारे परंतु या दोघांचाही परस्परांबद्दल प्रेम वाटत असले तरी, विवाह होऊ शकत नाही. हेही खांडेकरांनी कौशल्याने दाखवले आहे.

या कादंबरीतील स्वभावचित्र ठसठशीत आहेत. प्रवासवर्णनाचे खांडेकरांनी रेखाटलेले चित्र मनोरम आहे. त्याचबरोबर समुद्राची विविध रुपे त्यांच्या प्रतिभेचे आणि कल्पकतेचे सौंदर्य अधिक स्पष्ट करणारी आहेत. समुद्र आणि खाडीचे नाते पाहून उल्केच्या मनात स्त्री पुरुष नात्याचे विचार येतात. ती म्हणते, ' बिचारी खाडी समुद्राला मिळते. समुद्र रंगात आला की खाडीला भरती येते. तो रागावून दूर गेला की खाडी म्हणजे वाळवंट होत नुसतं. खाडीच सार जीवन समुद्रावर अवलंबून. स्त्रीचेही असेच असेल का ?

या कादंबरीतल्या वातावरणात लेखकाची मनोवृत्ती अतिशय रंगून गेली होती. हे त्यांनीच लिहिलेल्या या कादंबरीत असलेल्या 'घरी एकच पणती.... लगबगती' या सुरेख कवितेवरून दिसून येते.

खांडेकरी शैलीत सहजपणे येणारी सुभाषिते, सुंदर कल्पना याही कादंबरीत आहेत. कृत्रिम अलंकरण येथे आढळत नाही. ठसठशीत स्वभाव रेखाटन, कलात्मक अशा प्रसंगाची निवड, विषयाच्या अनुषंगाने येणाऱ्या कविता, कथा, पत्र इ. गोष्टींचा या कादंबरीत लेखकाने केलेला वापर कादंबरीच्या आत्मनिवेदनपर रुपात अधिक सौंदर्य निर्माण करणारा आहे.

'दोन ध्रुव' ही चौथी कादंबरी. क्रमाने चौथी पण गुणाने पहिली. कृत्रिम अलंकार व रुक्ष व्याख्याने याचे ओझे या कादंबरीवर लादलेले नाही. भाषा सहज सुंदर आहे. मधून मधून संवाद पुष्कळ पेरलेले आहेत. खांडेकरांच्या बऱ्याच कादंबऱ्यांचे विषय सामाजिक आहेत. जीवनासाठी कलेचा अवतार आहे, आणि कला ही जीवनाला पोषक असते असेही त्यांचे मत होते. तेव्हा या जगातील सामाजिक विषमता ही दूर होऊन या 'दोन ध्रुवांतील अंतर जितके अधिकाधिक कमी होईल तितके जीवनात अधिक सुख निर्माण होईल असा विचार 'दोन ध्रुव' या कादंबरीत आला आहे. यात वाप्पांच्या रुपाने आलेले गांधीवादी पुढाऱ्याचे चित्र खांडेकरांनी इतक्या सुंदरतेने रेखाटले आहे की ते वाचताना कॉंग्रेसच्या अप्पा पटवर्धनांची प्रतिमा डोळ्यासमोर येते. या कादंबरीपासून लेखकाची वर्णनशैली वास्तवानुभवाचे यथार्थ दर्शन करण्याकडे अधिक झुकली आहे असे दिसते. या कादंबरीत आलेले संवाद आणि रहस्य ही खांडेकरांच्या कादंबरीचे वेगळेपण दाखवून जातात.

याचे थोडक्यात कथानक असे - वत्सला ही एका ललित लेखकाची बायको. ती कुरुप असल्यामुळे तो लेखक तिचा त्याग करतो. त्यामुळे ती कोकणात एका काजूच्या

---

आई हा आपल्या भाषेतील सर्वात पवित्र शब्द आहे.

कारखान्यात मजुरी करून दिवस कंठते. त्याच खेड्यातील एका कामकरीण शहरात जाऊन नटी होते. तिच्यावर ललित लेखक प्रेम करतो. अशा या दोन मार्गांनी त्या दोन जगांना सांधणारा पूल खांडेकरांनी निर्माण केला आहे. त्यांनी असे दाखविले आहे की, 'कला आणि जीवन, पांढरपेश्या व कामकरी, भोग आणि त्याग-वत्सलेला जिकडे तिकडे ध्रुवांच्या जोड्या दिसू लागतात. ध्रुव दोन हेच खरे ! पण त्यांच्यातले हे भयंकर अंतर ! या अंतरामुळेच जगातील सारी दुःखे उत्पन्न झाली आहेत.

जीवन व कला यांचे ऐक्य होणे आवश्यक आहे हे सांगताना या कादंबरीतील बाप्पा(गांधीवादी) म्हणतात,' जीवन म्हणजे जमीन. काळी, उंचसखल, ओबडधोबड पण तिच्यातूनच पिकं निघतात. कला ही आकाशासारखी! आकाशात नक्षत्र चमकली तरी फळ जमिनीवरच पिकतात.

'दोन ध्रुव' व 'उल्का' याप्रमाणेच त्यांची 'हिरवा-चाफा' ही कादंबरी आपल्या विशिष्ट गुणांनी लोकप्रिय झाली. अलंकारांची कृत्रिमता कमी करून प्रणयाची मादकता या कादंबरीत खांडेकरांनी वाढवलेली आहे. हिच्यातील 'दोन रहस्ये' हे प्रकरण तर फडक्यांच्या कोणत्याही कादंबरीत सहज खपून जावे इतके सुंदर व प्रणयरम्य आहे.

आपले गुरु श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्यापासून रहस्यमयता हा गुण घेऊन खांडेकरांनी या कादंबरीत ओतला आहे. नायिका सुलभा ही एका श्रीमंत वकिलाची डॉक्टर झालेली मुलगी. तिचा भाऊ मनोहर याचर खुनाचा आरोप आलेला आहे, म्हणून तो फरारी झालेला असतो असे सुरवातीला समजते. मध्यंतरी तो अभय मित्र या नावाने लपत छपत येऊन भेटतो. आणि शेवटी तो खून त्याने केलेला नसून एका पठाणाने केलेला आहे हे उघडकीस येते. तसेच दुसरे रहस्य त्याच्यावर प्रेम करणारी केशर हिचे तो एका गिरणीवाल्याची मुलगी, ऐश्वर्यात लोळणारी, गाण्यात निपुण, पण तिच्या आईला तारुण्यात वाईट मार्गाला लावलेले असते. कोणी ? तर सुलभेच्या वकिल वडिलांनीच. स्वाभाविकतेला धक्का न देता रहस्ये आली तर ती जिज्ञासा वाढवू शकतात. पण तसे येथे होत नाही. सुलभा प्रेम करते मुकुंदावर. तो कामगारांचा पुढारी असतो. त्याच्या मुखातून समाजसत्तावादाची तत्वे खांडेकरांना पोषित करता आली आहेत. आयुष्य एक लढाई आहे हा विचार या कादंबरीत मुकुंद व सुलभा यांच्या संवादातून सहजपणे आला आहे. मुकुंदा 'श्रम हेच भांडवल' हे साम्यवादी तत्व नायिकेच्या मनावर बिंबवतो. सामाजिक क्रांती घडवून आणण्याची जबाबदारी व एक प्रकारची शक्ती ही मध्यमवर्गातच आहे असेही येथे दाखवले आहे.

हिरव्या चाफ्याचा वास दुरून येतो. ते फूल लपलेले असते झाडावरील पानात. त्याचप्रमाणे ध्येय, प्रेम दूर असते. पण हृदयाला ओढ लावीत असते. ही कल्पना या कादंबरीत चाफ्याच्या सुगंधाप्रमाणे ओतप्रोत भरून राहिलेली आहे.

वर उल्लेखिलेल्या कादंबऱ्यांखेरीज 'पहिले प्रेम', 'पांढरे ढग' व 'क्रौंचवध' या कादंबऱ्यांची वाचक वर्गाकडून अक्षरशः पारायणे झाली आहेत. महाराष्ट्रातील मध्यम वर्गाचे चित्रण-सत्त्वशून्य आणि ध्येयशून्य होत चाललेल्या मध्यम वर्गाचे चित्रण- हे 'पांढरे ढग' या कादंबरीची पार्श्वभूमी आहे. मध्यम वर्गाच्या जीवनविषयक आणि समाजविषयक सर्व कल्पना हळू हळू पांढऱ्या ढगासारख्या फिकट होत चाललेल्या आहेत. येणाऱ्या जीवनाचे स्वरूप विलक्षण कुरूप गुंतागुंतीचे असून एखाद्या कृष्णमेघासारखे ते असून त्यातून क्रांतीची विद्युल्लता परोपरी डोकावून पहात आहे. अशा परिस्थितीत असताना यातून पुढचा मार्ग काढून नवी समाजमंदिरे कशी कोणत्या मार्गाने उभी करायची आहेत याचे कलात्मक दर्शन या कादंबरीत घडते.

'पहिले प्रेम' हा तर अनेकांच्या जिव्हाळ्याचा विषय, अनुभवाला येणारा. प्रेम म्हणजे शेवटी असत तरी काय ? त्याचे स्वरूप खरोखरीच नेहमी ताजे टवटवीत असते

का ? प्रेमात अनुभवाला येणारी विफलता ही प्रेमिकांच्या जीवनात तीव्र निराशा निर्माण करते. मग या पहिल्या प्रेमाचे खरे स्वरुप शोधण्याचा - त्याच्या लक्षणीय वेध घेण्याचा प्रयत्न या कादंबरीत झालेला आहे. पहिल्या प्रेमाच्या बाबतीत विशिष्ट वयात असणारी विलक्षण भावूक, हळवी वृत्ती ठेवून उपयोगी नाही. किंवा या प्रीतीच्या मागे लागून स्वप्नील होऊन सबंध आयुष्य दुःखी करण्यातही अर्थ नाही. असे 'प्रेमदर्शन' या कादंबरीत आले आहे. प्रीतीतील समतोल, परस्परांना सांभाळून घेण्याची वृत्ती, जीवनात एकमेकांना दिलासा देत प्रेमभावना ही वृद्धिंगत कशी होते याचा एक सुंदर अनुभव यात देण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे.

याच भावनेचे एक दुसरे दर्शन किंवा बाजू म्हणून 'जळलेले मोहोर' मधे आले आहे असे वाटते. या कादंबरीच्या प्रस्तावनेत लेखक म्हणतात, 'तरुण स्त्री-पुरुषांनी प्रेमजीवनात शरीरसुखाचा भाग अतिशय महत्त्वाचा मानला आहे. परस्परांच्या आनंदसंवर्धनाकरिता आपण एकमेकांचे हात हातात घेतले आहेत. याचा त्यांनी स्वतःला कधीही विसर पडू देऊ नये. आयुष्याच्या प्रवासातील खरीखुरी मौज आपल्या सोबतीतच आहे. इ. गोष्टी मी सांगितल्या तरी केवळ कामतृप्ती हे संसाराचे कधीच ध्येय होऊ शकत नाही, हे कोण नाकबूल करील का ? आकाशातल्या चंद्राला हात लावण्याच्या धडपडीने माणसांचे पृथ्वीवरले पाय सुटले तर तो तोंडघशी पडतो. एवढेच मला सुचवायचे आहे. तो चंद्र योग्य वेळी अनेकांच्या हाताला लागतो नाही असे नाही. पण त्याचा लाभ संसाराच्या सुरवातीला होत नाही. दहा वीस वर्षे संकटे आणि सुखे यांची चव घेतल्यावरच त्या चांदण्याची वृष्टी होऊ लागते. त्या दृष्टीने उदात्त प्रीती हा शुक्ल पक्षातला चंद्र नाही तो वद्य पक्षातला आहे.' खांडेकरांचे प्रेम विषयक हे विचार लक्षात घेण्यासारखे आहेत. प्रीतीचे मधुर दर्शन घडवूनही त्या लेखनात कुठेही लैंगिकता आलेली नाही हे लेखनशैलीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य.

'अश्रू' ही ही मध्यम वर्गाच्या परिस्थितीवर नेमकेपणाने बोट ठेवणारी कादंबरी. शंकर हा या कादंबरीचा नायक. गेल्या काही वर्षांत मध्यम वर्गाची जी अनेक प्रकारे दुर्दशा झाली त्या दुर्दशेचे चित्रण करणारी ही कादंबरी. प्रामाणिकपणे जगू इच्छिणाऱ्या माणसाच्या मानसिक कुचंबणेवर लेखकाने येथे प्रकाश टाकला आहे.

'क्रौंचवध' ही खांडेकरांची १९४२ मधे प्रसिद्ध झालेली क्रमानुसार बारावी कादंबरी. याही कादंबरीचे स्वरुप सामाजिक आहे. क्रौंचवध कादंबरीची नायिका सुलोचना ही आत्मनिवेदन करते. आणि या आत्मनिवेदनातून कथानकाची गुंतागुंत लेखकाने निर्माण केलेली आहे. दादासाहेब दातार हे सुलोचनाचे वडील, दिनकर हा त्यांच्या घरी रहावयास आलेला हुशार विद्यार्थी आणि सुलोचना ही नायिका या तीन केंद्रबिंदूभवती कथानक फिरत रहाते.

आधुनिक महाराष्ट्रावर असलेला बुद्धिवादाचा प्रभाव, या प्रभावामुळे राजकीय व सामाजिक जीवनात घडणारी विविध आंदोलने व या राजकीय आंदोलनांमुळे काही प्रमाणात निर्माण झालेला हा अनुदार दृष्टीकोन या सर्व गोष्टींचा परिणाम खांडेकरांच्या मनावर या कादंबरीची आखणी करताना झालेला आहे, असे वाटते. कारण कादंबरीत उल्लेखिलेल्या तीन व्यक्तिरेखा या विशिष्ट भावनांच्या प्रातिनिधीक रूपाने आलेल्या आहेत. यातील दादासाहेब दातार हे बुद्धिवादी वर्गाचे प्रतिनिधी. सुलोचना ही दुबळ्या भावनेची प्रतिनिधी, तर दिनकर हा बुद्धी आणि भावना यांचा योग्य तो मिलाफ करून वागणारा यांचा प्रतिनिधी आहे असे दिसते.

याचे थोडक्यात कथानक असे. दादासाहेब दातार हे कॉलेजमध्ये प्रोफेसर असतात. संस्कृत साहित्याचा त्यांचा व्यासंग भरपूर असतो. एखादा श्लोक अनेकवेळा शिकवलेला असूनही तो आज नव्याने पुन्हा कसा शिकवावा याचा ते विचार करतात कलेवरही त्यांचे प्रेम आहे. त्यांना कालिदास मुखोद्गत आहे. आपली मुलगी आणि आपले

वैवाहिक जीवन यांच्या आठवणीत ते रंगून जातात. कादंबरीतील विशिष्ट घटनांचा निर्देश त्यांच्या बुद्धीवादीपणाचा द्योतक आहे. असे दिसत नाही. पण 'एका बुद्धीवादी माणसाची कथा' यात आपल्यावर बुद्धिवादाचा पगडा आपल्या मनावर कसा बसला आणि पूर्वायुष्यातील कोणकोणत्या गोष्टींमुळे आपण इकडे वळलो याची नोंद आहे. स्वतःच्या पत्नीच्या मृत्यूदिनी मात्र ते अलिप्तासारखे गीता वाचत बसतात.

त्यांची मुलगी सुलू ही भावनाशील आहे. बुद्धीने असामान्य आहे. लहानपणापासून सुलूला दादासाहेबांनी मोकळेपणाने वाढवले आहे. माझ्यानंतर सुलूच संस्कृतची प्रोफेसरीण होणार असे एकसारखे म्हणून सुलूच्या मनातील महत्त्वाकांक्षा त्यांनी सतत फुलवली. सुलूचे जीवन तिच्या मनात असलेल्या निसर्गाविरुद्ध भावनांनी घडलेले आहे. कारण तिच्या मनात दिनकर विषयी प्रेम असते, पण तिचा विवाह मात्र रामगडच्या प्रसिद्ध सर्जनशी होतो, ज्यांच्याशी ती कधीच एकरूप होऊ शकली नाही. तिचे मन दिनकरच्या घडणाऱ्या क्रांतीकारक चळवळींभोवती गुंतून पडते. आपल्याला होणार असलेल्या मुलाचे नावही ती दिलीप(दिनकरचे तिने ठेवलेले नाव) ठेवायचे ठरवते. ती अनेकवेळा दिनकरला भेटते. त्याचे घरी येणे किंवा त्याचे सुलूला भेटणे व भगवंतरावांशी झालेले राजकीय विषयावरील मतभेद घडत राहतात. दिनकरने आपली नोकरी सोडलेली असते. प्रारंभी तो संस्थानाच्या बाहेर जाऊनही सामाजिक कार्य करतो. दिनकरचे वडील रामगड संस्थानात फौजदार असले तरी आपल्या मुलाचे उद्योग त्यांना फारसे प्रिय नसतात. दिनकर शेतकरी संघटना बांधतो, संस्थानात चळवळी घडवून आणतो. तुरुंगातील कैद्यांना मिळणाऱ्या कदान्नाविषयीही तो अन्नसत्याग्रह घडवून आणतो. कादंबरीत आलेला दिनकरच्या संदर्भातील आणखी एक प्रसंग म्हणजे संस्थानचे राजे स्वतःच्या प्रकृती स्वास्थ्यासाठी परदेशच्या दौऱ्यावर जाणार असतात. याचा खर्च जनतेवर कर लादून वसूल करणार असल्याचे दिनकरला कळल्याबरोबर तो या गोष्टीविरुद्ध आवाज उठवतो, जनजागरण करतो. राजेसाहेबांचे आपल्या संस्थानाकडे व प्रजेकडे फारसे लक्ष नसते ते बरेचदा संस्थानाबाहेर असतात अशा वातावरणात दिनकरने बोलाविलेल्या शेतकऱ्यांच्या सभेत दंगल, गोळीबार होण्याची शक्यता सुलूला कळते. तेव्हा ती दिनकरला चिठी पाठवून बोलावून त्याला वाचविण्याचा प्रयत्न करते पण तरीही राज्य उलथून पाडण्याच्या चिथावणीच्या आरोपावरून त्याला फाशीची शिक्षा होते. पण पुढे भगवंतरावांचे मन दिनकरने दादासाहेबांना लिहिलेल्या एका सविस्तर पत्राच्या वाचनावरून बदलते आणि दिनकरची फाशीची शिक्षा भगवंतराव रद्द करतात.

बुद्धी आणि ध्येय, बुद्धी आणि भावना यांच्या समस्पर्शी न्यायातून, समतोलातून, उद्या येऊ शकणारे, हवे असलेले समाजवादाचे एक चित्र खांडेकरांनी या कादंबरीत निर्माण केले आहे. क्रौंच पक्ष्याच्या वधाचे चित्र याचाही उपयोग प्रतिकासारखा केला आहे. जगातला प्रत्येक अन्याय त्या चित्रातील पक्ष्याला बाण मारणाऱ्या रानटी निषादाप्रमाणे लेखकाला वाटतो. त्या निषादापाशी जसे धनुष्यबाण असतात तसेच जगातसुद्धा प्रत्येक अन्यायाच्या पाठीशी पाशवी शक्ती उभी असते आणि तिला बुद्धीची वा भावनेची कशाचीच फिकीर वाटत नाही. या क्रूर शक्तीपायी समाजात अनेक निरपराधांची हत्या होत असली तरी तिला त्याचे दुःख नाही. कारण विनाशातच आनंद मानणारी ही अन्याय शक्ती असते.

या कादंबरीतही लेखकाचे समाजमनस्क मन, चिंतनशील वृत्ती किंवा समाजातील अन्याय, दंभ, मत्सर याविरुद्ध बंडखोर विचार करण्याची भाऊंची प्रवृत्ती झालेली आहे. १९३०-४० च्या सुमारास तत्कालीन महाराष्ट्रामधे घडणाऱ्या वैचारिक संघर्षाचे मात्र पुरेपूर प्रतिबिंब या कादंबरीत उमटले आहे. त्या वेळची निष्क्रिय वयस्क पिढी

व आदर्शवादी पिढी किंवा आवेशपूर्ण असा समाज - राजकारणात भाग घेणारी तरुण पिढी यांचे चित्रण या कादंबरीत खांडेकरांनी समर्थपणे उमटवले आहे. त्यामुळेच ही कादंबरी अतिशय लोकप्रिय ठरली.

खांडेकरांची आणखी एक कादंबरी 'अमृतवेल' खांडेकर हे जीवनवादी लेखक आहेत हे आपण पाहिले. मानवी जीवनाचा अर्थ कळो वा न कळो. ते जगणे सुरूच आसते. देवदत्त आणि वसुंधरा या तरुण जोडप्याची या कहाणी कादंबरीत आहे. हे तरुण, सुशिक्षित, सुंदर पण मनाने कधीच जवळ न आलेले जोडपे. देवदत्ताच्या मनाची अशांती व त्याच्या जीवनात समतोल निर्माण करू पाहणारी नंदा. या एकूण कादंबरी दर्शनात कुठे स्वभाव रेखाटनाला महत्त्व दिलेले दिसते. तर कुठे विशिष्ट प्रकारच्या मूल्यदर्शनाला महत्त्व दिलेले दिसते. भाऊंनी उपभोगलेल्या अवध्या आयुष्याचा अर्क त्यांच्या तत्त्वचिंतनातून आणि सौंदर्यविष्कारातून 'अमृतवेल' मधे आला आहे. स्वप्नभंग हे भाऊंचे सर्वात मोठे दुःख आहे. पण या दुःखाला त्यांचे मन कवटाळून बसत नाही. 'भग्न स्वप्नांच्या तुकड्यांना कवटाळून बसण्यासाठी मनुष्य जन्माला आलेला नाही. भविष्याच्या गरुडपंखांच वरदानही त्याला लाभलेल आहे. एखादं स्वप्न पाहणं, ते फुलवण., सत्यसृष्टीत उतरावं म्हणून धडपडणं, त्या धडपडीतील आनंद उपभोगण आणि ते स्वप्न भंग पावलं तरी त्याच्या तुकड्यांवरून रक्ताळलेल्या पायांनी दुसऱ्या स्वप्नामागे धावणं हा मानवी मनाचा धर्म आहे. मनुष्याच्या जीवनाला अर्थ येतो तो त्यामुळे !' भाऊंनी व्यक्त केलेले हे स्वतःचे दुःख असले तरी मानवी जीवनाला गवसणी घालणारे तत्त्व आहे. भाऊंच्या शब्दांचे सामर्थ्य हे की भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांचे भान ठेवून भविष्यकाळात काय स्वीकारावे, काय स्वीकारले पाहिजे हे तितक्याच समर्थपणे ते व्यक्त करतात.

'अमृतवेल' चे थोडक्यात कथानक असे - यातील दादा ४२च्या चळवळीत नोकरी घालवून बसतात. शेखरच्या मृत्यूने नंदा घायाळ होते. मुलगी मेल्याचे दुःख माईच्या वाट्याला येते - नवऱ्याच्या विचित्र वागण्याने आणि त्याच्या वियोगाने वसू दुःखी असते - देवदत्त मायेला पारखा होऊन वणवण भटकत असतो -दारिद्र्याला आणि पत्नीच्या आजाराला कंटाळून गेलेले बापू अशी सर्वच पात्रांची आयुष्यात फरफट होत असते. पण प्रत्येकजण आपपल्या परीने दुःखाच हलाहल पचवून अमृताचा शोध घेण्यासाठी पुढे चालत राहतात. आयुष्याची अमृतवेल गगनापर्यंत पोचविण्यासाठी दुःखाच हलाहल पचवून पुढे पाऊल टाकण हेच जीवनाच खर सूत्र आहे हे भाऊंनी अमृतवेलमधे समर्थपणे दाखवले आहे.

भाऊंनी १५ कादंबऱ्या लिहिल्यया. त्यातील 'ययाती' ला महाराष्ट्र शासनाचा साहित्य अकादमीचा आणि ज्ञानपीठाचा पुरस्कार प्राप्त झाला. त्याचा स्वीकार करताना भाऊ म्हणाले, 'सौंदर्य, सामर्थ्य आणि साधुत्व यांचा आज सन्मान होत आहे.' यावरून त्यांची विनयशील वृत्ती दिसून येते.

'ययाती' ही पौराणिक कथेवर आधारित कादंबरी इतक लोकप्रिय ठरली की १ल्या, २ऱ्या व ३ऱ्या आवृत्तीच्या ३/३ हजार प्रती खपल्या. ४थ्या आवृत्तीच्या १६००० प्रती काढल्या गेल्या होत्या. या लेखनाही अंतिम प्रेरणा ययातीच्या स्वभावरेखेने त्यांना मिळाली असे ते म्हणतात.

महाभारतातल्या मूळ कथेत ययातीचे चित्रण अतिशय प्रतिनिधिक आहे. ययाती हा आजच्या सर्वसामान्य मनुष्याचा पुराणकाळातील प्रतिष्ठित प्रतिनिधी आहे. विविध सुखे मिळूनही तो सदैव अतृप्त आहे. नव्या नव्या सुखांच्या मागे आंधळेपणाने तो धावत आहे. सुख आणि आनंद यांच्यातील फरक त्याला कळत नाही. सुख-क्षणभर मिळणारे शरीरसुख- हेच चिरंतन सुख मानून ते सतत कसे मिळेल याचेच तो चिंतन करीत असतो. त्याच्या भावजीवनात दुसरे कुठलेही मूल्य नाही. खांडेकर म्हणतात,

---

'जुनी आत्मिक मूल्ये उध्वस्त झाली आहेत आणि नवी आत्मिक मूल्ये निर्माण झाली नाहीत अशा संधिकाळात सर्वसामान्य मनुष्य हा ययातिसारखाच वावरत आहे. सुखाचा आंधळा शोध हाच त्याचा धर्म होऊ पहात आहे.

परंतु आज आपण पहातो की मनुष्य सुखाच्या पाठीमागे धावतो ते केवळ स्त्री सुखामागे धावत नाही तर इतरही नाना गोष्टींचा मोह त्याचे व्यक्तिमत्त्व हिणकस बनवत आहे. खांडेकरांच्या या पौराणिक कादंबरीच्या मुळाशी सुद्धा लेखकाची सामाजिक चिंतनशील वृत्तीच दडली आहे.

समाजातील अप्रिय गोष्टींनी खांडेकरांचे मन अस्वस्थ होत असे ते म्हणतात, 'सार्वजनिक व्यवहारातील लाचलुचपत, समाजातील वाढती गुन्हेगारी, कुटुंबसंस्थेतील अस्वस्थता व असंतुष्टता, विद्यार्थी वर्गात पसरलेले बेशिस्तीचे वातावरण, नाचगाण्याचे उत्तान चित्रपट, कामवासना आणि प्रेमभावना यांनी समाजात वाढत्या प्रमाणात होत चाललेली गल्लत, कोणत्याही दुर्गुणाविषयी दिसून येणारी सामाजिक बेफिकिरी, किंबहुना कुठल्यातरी शास्त्राच्या अर्धवट आधाराने त्याचे मंडन करण्याची प्रवृत्ती यांचा परस्परांशी किंवा सामान्य माणसाच्या मनाला आलेल्या या अवकळेशी काही संबंध नाही असे ज्यांना वाटत असेल ते भाग्यवान आहेत, पण मी त्या पंक्तीत नाही.'

ययातीचे थोडक्यात कथानक असे. ही कादंबरी म्हणजे ययातीचा कामकथा आहे. त्याच्या मनात असलेल्या स्त्रीच्या उपभोगाच्या प्रदीर्घ आणिवेची ती एक करुण कहाणी आहे. असे म्हणता येईल. देवयानी, शर्मिष्ठा, ययाति ही सारी पात्रे प्रतिनिधिक आहेत. ययाती हा दासीकन्या अलकावर प्रेम करतो. तिच्याशी प्रणयलीला करतो, त्याच वेळेस मुकुलिकेवरही प्रेम करतो. वनात शिकारीला गेल्यावर देवयानीच्या सौंदर्यावर लुब्ध होऊन तिच्याशी विवाह करतो. पण वैवाहिक जीवनात देवयानीवर उत्कट प्रेम करणारा ययाती देवयानीची दासी म्हणून आलेल्या शर्मिष्ठेच्या मोहपाशात अडकतो. हे सगळे क्षणभंगुर अशा शरीरसुखासाठी आसुसलेले, त्यासाठी स्वत्व आणि सर्वस्व गमावले जाईल याची यत्किंचितही जाणीव नसणारे चित्तातूर जंतूच. जीवन कसे असावे याचे चित्रण भाऊसाहेबांनी कचाद्वारे दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. निरपेक्ष प्रेमाचे प्रतिक म्हणजे कच. ययातीच्या बाबतीत त्याला स्वतःच्या भावनांवर कधीही विजय मिळविता आला नाही. अगदी आयुष्याच्या अखेरीला सुद्धा. अखेरीस ययाती मद्यपानाच्या आधीन झाल्यानंतरही दुःखीच राहिलेला आहे. मद्य, मृगया आणि मीनाक्षी एवढ्या तीनच गोष्टी जगात खऱ्या आहेत असे त्याला वाटत असेत. अष्टौप्रहर विलासात मग्न रहावयाचे हेच जवळ जवळ ययातीच्या आयुष्याचे ध्येय बनून गेले होते. वर्षामागून वर्षे जात होती पण या जीवनक्रमात कधीही खंड पडला नाही. एखाद्या देवमूर्तीवर आज वाहिलेली फुले उद्या निर्माल्य म्हणून टाकून दिली जातील. त्याप्रमाणे ययातीच्या सुखविलासासाठी नवनव्या सुंदर तरुणी येत होत्या आणि जात होत्या. त्या कुठून येत होत्या आणि जात होत्या याची पर्वा ययातीने कधीच केली नाही. स्वतःच्या सुखाचा पेला सतत काठोकाठ भरलेला रहावा एवढीच मनीषा होती. आपली उपभोग घेण्याची शक्ती नाहीशी होणार ही जेव्हा त्याला जाणीव होते तेव्हा तो अस्वस्थ होतो.

ययाती बरोबरच अन्य महत्त्वाच्या व्यक्तिरेखा देवयानी, शर्मिष्ठा, कच. देवयानी ही शुक्राचार्यांची रूपगर्विता कन्या. ययातीची पत्नी. स्वतःच्या रूपाच्या बळावर ययातीला दारू सोडण्याची शपथ ती ययातीला घालते. पण एक दिवस ती शपथ मोडून भरपूर मद्यपान करून त्या धुंदीत तो देवयानीच्या महालात प्रवेशतो. पण ती त्याला स्पर्श करू देत नाही. इथूनच त्यांच्या संसाराची करुण कहाणी सुरू होते. मद्य आणि मदिराक्षी यांच्या सहवासात राहून ययाती सुखाच्या शोधात रहातो तर देवयानी महाराणी असूनही परित्यक्त्या बनते.

(पान क्रमांक १७ वर)

# विख्यात तबलावादक भाई गायतोंडे यांच्याशी झालेल्या गप्पा

सौ. मनाली देवधर, सौ. वीणा जोशी,
श्री. संजय वोस्कर

*(भाई गायतोंडे आणि तबला हे समीकरण ठाण्यातील संगीत प्रेमींच्या परिचयाचे आहे. तबला व तबलावादन या संदर्भात आमच्या शाळेतील शिक्षकांशी भाईंचा झालेला हा वार्तालाप- संपादक)*

विश्वाच्या या अफाट पसाऱ्यात ६४ कलांच्या आणि १८ विद्यांच्या प्रांगणात, वाटलं ! आपण एका सुंदर वाद्याची आणि एका गुणी कलावंताची मुलाखत घ्यावी. आपल्या ठाण्यातील सुप्रसिद्ध तबला वादक श्री. भाई गायतोंडे यांच्याकडे आम्हा कलाप्रेमींचे बस्तान बसले. मनाच्या समुद्रावर खळाळणाऱ्या प्रश्नांना त्यांनी सुंदर उत्तर दिली की, तेथून पाय निघेना. मुलाखत संपवून जेव्हा आम्ही बाहेर पडलो तेव्हा मन कसं, तालावर हिंदोळत होत आणि .... सारा दिवस स्वर-तालाच्या आंदोलनात कुठे हरवला ते कळलंच नाही. मोठ्या अगत्याने स्वागत होऊन विचारांच्या आवर्तनास सुरवात झाली.



श्री. भाई गायतोंडे

**मनाली :-** भाई, तबला आणि तबला वादन ह्या संदर्भातील समज व गैरसमज समजून घेण्यासाठी आम्ही अभ्यासक म्हणून आलो आहोत. तर पहिला प्रश्न-

आपण यशस्वी इंजिनिअर, तरीही तबला वादनाकडे कसे वळलात ? की आपणास बालपणापासून हा छंद होता ?

**भाई :-** तो जमाना नाट्यसंगीताचा होता. माझे वडिल पेटी व तबला दोन्ही साथ करत व माझी बहीणही पेटी वाजवते. भाऊ बुलबुलतरंग व मी तबला वाजवतो. पुष्कळ कार्यक्रम आमच्या घरातच होत. घरातल्या या वातावरणाचा आमच्यावर फार परिणाम झाला. वयाच्या पाचव्या वर्षापासून मी साथ करीत असे. येणाऱ्या कलाकारांकडूनही मी खूप शिकलो. काही वर्षे कोल्हापूरात होतो. कोल्हापूरला खूप कलाकार होते. १९४४ साली आम्ही इथे आलो. माझे पहिले गुरूजी होते श्री. सुधाकरबुवा टिपणीस.

**वीणा :-** म्हणजेच योग्य तऱ्हेने शिक्षणास सुरवात १९४४ साली झाली ? नाही ?

**भाई :** - १९४४ ते ४९ माझे ४ गुरु झाले. वाजवत होतो, शिकत होतो; कार्यक्रम होत होते. नंतर मी प्रभात कंपनीत वाजवणाऱ्या श्री. बाळुभाई रुपरीकरांकडे शिकलो. माझ्या शाळेत व कॉलेजमधे ही संगीताचे वातावरण होते. तेव्हा सूर्यकांत मांढरे बरोबर मी नाटक गाजवलं- व शाळा व कॉलेजमधे एक प्रसिद्ध विद्यार्थी म्हणून पदार्पण केल.

**संजय :-** तुमच्या त्यावेळच्या भावना काय होत्या ?

---

आईशी कृतघ्न होतो, तो माणूस असूच शकत नाही.

भाई :- थोडं यश, थोडी प्रसिद्धी मिळाली; आणि आज असं मुलांना वाटतं तसं मला ही वाटलं. "मला तबला आला"! ..... पण मला जेव्हा जगन्नाथबुवा भेटले तेव्हा त्या पहिल्या क्षणालाच मला वाटलं की आपल्याला काहीच येत नाही. त्यांनी सांगितल ते मला तितकेसे वाजवायला जमलं नाही. आणि याच भेटीत त्यांनी मला रियाजाचा मंत्र दिला. आज मुलं लगेच प्रश्न विचारायला सुरवात करतात. पण गुरु पुढे आम्ही बोलत नसू. जे काही बोलायचे ते तेच बोलत.

संजय :- आपण या क्षेत्रात करियर करणार होतात ?

भाई : - छे, छे, मी फक्त शिकत होतो. वडिल व गुरु यांच्या देखरेखीत रियाज करत होतो. त्यांच्या परवानगी शिवाय मी थांबत नसे. हातातून बोल (अक्षर) व्यवस्थित निघाल्या नंतर म्हणजे तब्बल ३ वर्षांनी त्यांनी मला कायदे, पलटे, रेले... इ. शिकवले.

वीणा :- आजचे विद्यार्थी या पद्धतीने शिकू शकतील ?

भाई :- छे, शक्य नाही, माझं बालपण हे माझ्याकरता Golden age होतं. पण शाळा, क्लासेस, परीक्षा इ. अनेक कारणांनी आजच्या मुलांच /बालपणच हरवलयं.

मनाली :- पण तरीही घाई असतेच; प्रश्न असतातच. सोलो कधी वाजवता येईल ? Stage Show कधी होईल ? सगळ्या परीक्षा कशा झटपट देता येतील ? नाही का ?

भाई :- माझ्याकडे एक जण आले, म्हणाले, 'दोन वर्षात मला पूर्ण तबला शिकायचाय. तर तुमची फी काय ? मी सांगितल, "गेली ५० वर्ष मी शिकतोय पण अजूनही मी पूर्णत्वास पोहचलो नाही आणि करियरसाठी मी शिकवत नाही. हं! तुमची सोय करुन देवू शकतो.

संजय :- म्हणजे अजूनही तुम्ही शिकताय ?

भाई :- होय ! आमचे गुरुजी म्हणायचे,'ये जो लंबे कान है, ये गधे के नहीं है, गुरु की इजाजत लेके हम बजाते है, ये खिंच -खिंच के बडे हुअे है ।"

आता असं बघा ६० वर्षांत मी जे शिकलो; ऐकलं त्याचा प्रयत्न केला पण शिकायच्या व मी न ऐकलेल्या अशा कितीतरी गोष्टी आहेतच.

वीणा :- खरं आहे अगदी ! संगीतात आपल्या श्रवण कलेला अतिशय महत्त्व आहे. जेवढं गाण ऐकू तेवढं थोडचं ! पण गायक आणि वादकाचा सु-संवाद असला तरच मैफील रंगते. या बद्दल तुम्हाला काय वाटंत ?

भाई : - स्टेज वरील मैफील हे एक टीम वर्क असतं. तबला-गाणं-तंबोरा सगळ कसं सुरेल हवं. अगदी तंबोरा वाजवणं सुद्धा सोपं नाही. सर्वांनाच तंबोरा चांगला वाजवता येत नाही. त्याचप्रमाणे तबल्याचं ही आहे.

मनाली :- तबला साथ आणि गायकी काय संबंध आहे ?

भाई :-जशी गायकी तसा तबला वाजला पाहिजे. मी जयपूर घराण्यावरोबर वाजवेन तसं ग्वाल्हेर गायकीत वाजवणार नाही किंवा किराण्या घराण्याबरोबर माझी साथ अजून वेगळी असेल. जशी गायकी तसं वाजवलं पाहिजे. आवश्यक नसेल तर तिहाई पण वाजवू नये.

वीणा :- म्हणजे, तबला-साथ करण्यास सखोल अभ्यास आवश्यक आहे. नाही ? परंतु या 'घराणे' संकल्पनेबद्दल ही वाद-प्रवाद आहेत त्याचं काय ?

भाई :- आमचे वादन हे ४ घराण्याचे मिश्रण आहे. आणि मला वाटतं घराणे या संकल्पनेला फार महत्त्व आहे. आपण आपल्या घरातील संस्कृती, चालीरीती, पद्धती पाळतो मग ज्या घराण्यांच आपण नाव लावतो त्या गायकीचे -त्या घराण्याचे आपण का नियम पाळू नये ?

संजय :- तबला हे वाद्य पूर्णपणे भारतीय आहे काय ?

भाई :- अगदी पूर्णपणे भारतीय आहे. तबल्यावरील शाईमुळे तबला आपलं वेगळेपण सिद्ध करतो. हा प्रकार

आई हे सत्यात उतरलेले स्वप्न आहे.

पाश्चिमात्य वाद्यात नाही. तबला हे २००० वर्षांपूर्वीच वाद्य आहे. हे सुरेल वाद्य आहे. पूर्वीच्या लेण्यामधून तबल्याचा उल्लेख आहे पण त्याचा आकार उभा आहे. तबल्याच्या स्वरूपात हळूहळू बदल झाला व त्यास आजचे स्वरुप प्राप्त झाले.

**संजय :-** पूर्वी तबल्याच्या क्षेत्रात मुस्लिमांची हुकमत होती ? असे का ?

**भाई :-** त्याला काही इलाज नाही. त्यावेळचे वातावरण, संस्कृती, त्यास कारणीभूत आहेत. उदा. त्याकाळचे गोपाळ नायक - चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व परंतु ह्या कलाकाराला बंदीवान करून राजदरबारी नेलं व त्याने केलेली कलाक्षेत्रातील प्रगती अमीर खुसरोच्या नावावर नोंदवली गेली.

**मनाली :-** तबल्याच्या मार्गदर्शनासाठी तुम्ही कोणती पुस्तके वाचली ? विद्यार्थ्यांच्या दृष्टीने काही महत्त्वाची पुस्तके सांगावीशी वाटतात का ?

**भाई :-** मी जवळ जवळ ८० पुस्तके तरी वाचली, समजुन घेतली, आणि पारखून ही घेतली.

**मनाली :-** तुम्ही एखादे पुस्तक प्रकाशित केले का ?

**भाई :-** लिहावसं वाटंत, पण मी लिहिणार नाही. कारण एवढी पुस्तकं वाचली पण ती परीपूर्ण वाटली नाहीत.

**संजय :-** आत्मचरित्र ?

**भाई :-** नाही.

**वीणा :-** काही ताल कालाच्या ओघात फार मागे पडलेत. उदा. गणेशताल, लक्ष्मीताल ... इ. परीक्षेत आवर्जून विचारले जातात पण व्यवहारात याचा उपयोग होत नाही यावर आपलं मत काय ?

**भाई :-** एक तर हे बरेच सोलोचे ताल आहेत. आणि गाणारा व वाजवणाराच नसेल तर हे मागे पडणारच. माझ्या मते सर्वात महत्त्वाचा ताल १६ मात्रांचा. आपण त्याचा विचार करत नाही. हा ताल ४ x ४ = १६ असा नसून ४-८-४ असा आहे.

**मनाली :-** पण अशा काही सुधारणांसाठी आपण बुजुर्ग लोकांनी काही लिहायला हवे.

**भाई :-** हॉलंड मधील एक तबलजी माझ्याकडे आले. आपल्याला जाणवत नाही पण पाश्चात्य कलाकाराने सांगितले "भाई भारतीय तालांमधे त्रुटी आहेत, असं नाही वाटत ? मी कबूल केलं ४ x ४ = १६ असच जर आपण शिकवत राहिलं तर ? आणि जनमानस असा असतो की - यात आपलं काही नुकसान नाही ना, मग काय ? ... मग आहे तस चालू द्या.

**संजय :-** तुमची स्वत:ची अशी काही तालरचना......

**मनाली :-** किंवा कांही बोलांची निर्मिती केली आहे का ?

**भाई :-** खरं तर ही गुस्ताखी आहे .... बोलांची निर्मिती मी केली आहे. कारण माझी गुरुवर, रचनेवर श्रद्धा आहे. आणि मला ही गुरुंची परंपरा जतन करून ठेवायची आहे.

**मनाली :-** खूप वेळा असं होतं-बोटं चुकीची असतात आणि मुलं वाजवतात, असं का व्हावं ?

**भाई :-** तबला हे एक सुरेल वाद्य आहे. त्याचा मी अभ्यास करून एक आदर्श मापून Computer वर आदर्श बोल Feed केले आहेत.

**वीणा :-** इलेक्ट्रॉनिक तबले तंबोरे रियाजास किती उपयोगी ठरु शकतात ?

**भाई :-** ते रियाजास बरे, परंतु त्यात जिवंतपणा नाही आणि Live ideal -sound साठी short -cut नाही.

**संजय :-** एवढ्या व्यापातून तुम्ही तबल्याला कसा वेळ देता ?

**भाई :-** वेळ कधी मिळत नाही तो काढावा लागतो. दुसरं असं आहे गुरु चे मी काहीतरी देणे लागतो. पं. जगन्नाथबुवा, पं. तिरखवाँ माझे गुरु. मी इतर काही कपात करीन पण तबल्यात नाही.

---

**वीणा :-** आदर्श शिक्षक व आदर्श तबला वादक कसा असावा ?

**भाई :-** आदर्श तबला वादक आदर्श शिक्षक होईलच असे नाही व प्रत्येक आदर्श शिक्षक उत्तम तबला वादक असेलच असे ही नाही.

**मनाली :-** कलाकाराची "साठी" आवर्जून करतातच नाही?

**भाई :-** बुजुर्ग म्हणतात कमीतकमी १२ वर्ष शिक्षण, १२ वर्ष रियाज आणि १२ वर्ष दुसऱ्यांच ऐकणं, ३६ वर्षानंतर तो जर कार्यक्रम करू लागला तर ६०व्या वर्षी - जे ऐकलं, जे समजलं ते समजून उमजण्याचं वय, तेव्हा तो खरा मैफिलीस योग्य होतो. कार्यक्रम हा पूर्व तयारीनेच झाला पाहिजे. आजच्या २१व्या शतकात मुलांना बरेच व्याप आहेत व या व्यापातून त्यांना पुढं जायच आहे.

**संजय :-** तरीही तालीम करणारा विद्यार्थी तुमचा लाडका असेल नाही ?

**भाई :-** आम्ही गुरु-शिष्य ठरवून रात्र-रात्र रियाज करतो. अक्षरशः enjoy करतो.

**संजय :-** इतके उत्तम तबला वादक असून आपण प्रसिद्धी विन्मुख कसे राहिलात ?

**भाई :-** पूर्वी मंदिरात संगीत होतं. तेव्हा लोक (गायक) देवाची स्तुती करत, राजाश्रय मिळताच संगीत राजाची स्तुती करू लागले. राजे गेले आणि संगीत जन-दरबारात आलं. आता ती लोकांची आवड व लोकांची स्तुती आहे. आणि या आश्रयाला भरवसाच नाही. जनमानस बदलत असतो. संगीत हे अनेक शतकाचं सत्य आहे. आज जे चालू आहे. तो गोंधळ आहे. जी ईश्वर स्तुती आहे, देणगी आहे, जे ईश्वराच रुप आहे ते संगीत आजही सर्वांग सुंदर आहे. आणि मला वाटत १०,००० लोकांची वाहवा मिळवण्यापेक्षा गाणं कळणाऱ्या १० लोकांची वाहवा जास्त समाधान देणारी आहे. प्रसिद्धी मुळे आपली कला टिकतेच असे नाही.

**संजय :-** भारताबाहेरील तबला वादनाचा आपला अनुभव काय ?

**भाई :-** भारता बाहेर तबला वाजवणाऱ्यांनी व शिकवणाऱ्यांनी भारतीय संगीताची बंधन पाळावीत असे मला वाटते.

**वीणा:-** असा एक प्रवाद आहे, सुगम संगीत वाजवणाऱ्यांनी शास्त्रोक्त वाजवू नये, हातात लय रहात नाही...

**भाई :-** असे मुळीच नाही. कारण लय ही उपजतच असते. सुगम संगीत, शास्त्रोक्त संगीत, नाट्यसंगीत (गाणे व वाजवणे) हे वेगळे शास्त्र आहे. पण त्यासाठी अभ्यास व रियाज अतिशय आवश्यक आहे.

**संजय :-** जसं One day cricket आणि test तुमच्या क्रिकेट बद्दल तुम्ही काहीच बोलला नाहीत ?

**भाई :-** आंतर-शालेय व महाविद्यालयात मी क्रिकेटमधे Not-Out असे.

**वीणा :-** रियजासाठी कोणता तबला योग्य ? आणि रियाजाची कुठली पद्धत योग्य ? उदा. तबल्यावर कपडा टाकून रियाज करणे....

**भाई :-** ढाल्या तबला रियाजास योग्य. काळी १, पांढरी १ व भरपूर शाई असलेला तबला योग्य. रियाजाची पद्धत आहे. हाताला वजन येण्यासाठी आवश्यक आहे. पण हा रियाज गुरु समोर व्हावा.

**संजय :-** हल्ली थोडसं शिकतात व Albumsच्या मागे लागतात?

**भाई :-** मला हे पटत नाही. शेवटी शिक्षण -करीयर ह्या परस्पर विरोधी गोष्टी आहेत.

**मनाली :-** मनाला स्पर्शून गेलेली एखादी आठवण सांगाल ?

---

भाई :- असाच एक कार्यक्रम नेहमीप्रमाणे सुंदर झाला. आणि मला एका मोठ्या माणसाची शाबासकी मिळाली.

वीणा :- अरे वा ! कोण ते ?

भाई :- पु.ल. देशपांडे. ते म्हणाले, 'भाई, गाणं ऐकून डोळ्यात पाणी आणणारे, भाव-विव्हल करणारे कलाकार मी खूप पाहिलेत. पण तबला ऐकून प्रथमच डोळ्यात आनंदाश्रू आले. आज मी खूष आहे.''

संजय :- गुरु पौर्णिमेचा असलेला आदर व आजचे स्वरूप याबद्दल काय वाटतं ?

भाई :- पूर्वी गुरुकुल पद्धत होती. पण हल्ली प्रत्येकास ते शक्य नाही. म्हणून गुरुपौर्णिमेस सर्वांनी एकत्र यावे. विचारांची देवाण-घेवाण करावी. आणि अगदी प्रत्येकाने हजेरी लावावी.

वीणा :- आपण गांधर्व महाविद्यालयात शिकवण्यास आला तेव्हा त्यामागे आपली भूमिका काय ?

भाई :- गांधर्व महाविद्यालय पंडित पुलस्करांनी सुरु केले. व तो घेतलेला वसा आयुष्यभर सांभाळला आणि खूप भरीव कार्य केलं. त्यात माझा हा खारीचा वाटा.

वीणा, संजय, मनाली :- या क्षेत्रात Not Out राहण्यासाठी हार्दिक शुभेच्छा !

*मुलाखत -*

सौ. मनाली देवधर, सौ. वीणा जोशी,
श्री. संजय बोरकर
ए.के. जोशी हायस्कूल, ठाणे.
दूरध्वनी : ५४२ १४४७

•••

(पान क्र. १२ वरून )

**कादंबरीकार खांडेकर**

भाऊंच्या लेखणीचे एक वैशिष्ट्य - जीवन कसे आहे हे वास्तव चित्रण करून ती थांबत नाही, जीवन कसे असावे त्याचे सारे आदर्श आत्यंतिक श्रद्धेने आणि तळमळीने ती मांडत राहते. 'ययाती' आणि एकूण साहित्याची ऊंची त्यामुळेच उंचावते. ययातीवर लिहावे तेवढे थोडेच.

समारोप - खांडेकरांच्या सर्व कादंबऱ्यांवरून असे लक्षात येते की, खांडेकरांची मूळ प्रकृती गांधीवादाशी सुसंगत आहे. मानवतावाद यांचे पूजन करण्याच्या हव्यासातून ओढीतून खांडेकरांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखा निर्माण झाल्या आहेत. 'हृदयाची हाके' पासून 'क्रौंचवधा' पर्यंतची कादंबरी सृष्टी उत्पन्न करणारे जे मन आहे ते अत्यंत सुसंस्कृत आहे. दलितांच्या, दीन दुबळ्यांच्या, स्त्रियांच्या सर्वांगिण उध्दाराकरिता बाटणाऱ्या उदंड आणि जिवंत तळमळीने ते व्यापलेले आहे. या तळमळीमुळेच तर या कादंबऱ्या, कथानिवेदन, व्यक्तिदर्शन, संवादलेखन या तिन्ही दृष्टींनी बऱ्याचशा कलादुष्ट असूनही लोकप्रिय झाल्या. खांडेकरांनी या कादंबऱ्यांतून जी बरीचशी म्हणीवजा, सुभाषितवजा वाक्ये नवीनच तयार करून वापरलेली आहेत ते सुद्धा सर्व सामान्य वाचकांच्या दृष्टीने या कादंबऱ्यांचे एक छोटेसे आकर्षण आहे.

सौ. मंजिरी दांडेकर (कला शिक्षिका)
डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा.वि.)

•••

आईच्या डोळ्यात आनंदाश्रू येतील असे वागणे म्हणजे जीवन जगणे.

# माहितीचे तंत्रज्ञान आणि शिक्षण

श्री. अनिल शालीग्राम
श्री. प्रशांत देशपांडे

*(इंटरनेट, संगणक, माहितीचा विस्फोट हे नव्या युगाचे परवलीचे शब्द ! यातील माहिती तंत्रज्ञान संदर्भात व या तंत्रज्ञानाच्या शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाच्या संदर्भात या लेखात चर्चा केली आहे- संपादक)*

एकविसाव्या शतकात प्रवेश करताना आपण माहिती तंत्रज्ञानाची विस्फोटक वाढ अनुभवत आहोत. एकविसावे शतक हे माहिती युग म्हणून ओळखले जाणार आहे. माहिती युगात ज्ञान आणि तंत्रज्ञानाचे नवनिर्माण हे अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी असणार आहेत.

माहिती तंत्रज्ञान हे संगणक उद्योगापुरतेच मर्यादित असणार आहे असे नाही. तर माहिती तंत्रज्ञान हे जीवनातील सर्व अंगांना आणि क्षेत्रांना व्यापून टाकणार आहे. शिक्षण क्षेत्र हे देखील त्याला अपवाद असणार नाही.

किंबहुना शिक्षण क्षेत्राकडे दुर्लक्ष करुन अजिबात चालणार नाही. तसे झाले तर ज्ञानाच्या प्रसाराऐवजी ज्ञानाच्या मक्तेदाऱ्या तयार होतील. माहितीच्या व्यापक प्रसाराऐवजी ज्ञानाच्या माहितीची केंद्रस्थाने तयार होतील.

हा धोका विशेषतः भारतात जास्त आहे. कारण शैक्षणिक क्रांतीसाठी केवळ शिक्षण संस्था काही करु शकणार नाहीत. त्यासाठी लवचिक नोकरशाहीची आणि समंजस राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. आज देखील आपल्याकडे आपल्या परिस्थितीला अनुरुप अनेक शैक्षणिक तंत्रज्ञाने विकसित झाली आहेत. नाही असे नाही. पण ती धूळ खात पडून राहातात.

दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी जपानवर अमेरिकेने अणुबॉंब टाकून दोन शहरे बेचिराख केली. पण जपानने त्याच अमेरिकेची आधुनिक शैक्षणिक पद्धत आत्मसात केली. आणि त्याच्याच जोरावर तंत्रज्ञानात अमेरिकेवर कुरघोडी केली.

संगणक आणि डिजीटल तंत्रज्ञान यांमुळे मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात सर्वव्यापी बदल होणार आहेत. संगणक आणि डिजीटल तंत्रज्ञान या सर्व स्थित्यंतराचे माध्यम ठरणार आहे.

येथे औद्योगिक क्रांती आणि माहिती तंत्रज्ञानाची क्रांती यांची तुलना अप्रस्तुत होणार नाही. औद्योगिक क्रांती जगाच्या कानाकोपऱ्यात कशी पसरली ते आपण इतिहासात वाचतोच. तर माहिती तंत्रज्ञानाची क्रान्ती त्याहीपेक्षा विलक्षण वेगाने जगभर पसरणार आहे यात शंकाच नाही. गेल्या वीस वर्षात भारतात संगणकाचा वापर वाढत गेला आहे आणि गेल्या काही वर्षात इंटरनेटचा वापर वाढत जाताना दिसून येत आहे.

**भारतामध्ये इंटरनेटची साधारण अशी स्थिती आहे :**

जुलै २००० साली भारतात साधारण इंटरनेटचे उपयोग करणारे २५ लाख लोक असतील. तर डिसेंबर २००० पर्यंत हा आकडा ४५ लाखापर्यंत जाणार आहे. इंटरनेट वापरणाऱ्यांमध्ये बहुसंख्य ३० वर्षा खालील आहेत. यापैकी फक्त २०% व्यक्तींकडे स्वतःचा कॉम्प्युटर आणि इंटरनेट कनेक्शन आहे. तर बाकीचे ८०% ऑफिस आणि संस्थांची कनेक्शन वापरतात.

आज भारतामध्ये साधारण हे चित्र दिसून येते. ही माहिती बंगलोरमधील एका संस्थेने केलेल्या सर्वेक्षणा वरून घेण्यात आली आहे.

जरी आपली अर्थव्यवस्था आणि अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशांची अर्थव्यवस्था यांची तुलना होऊ शकत नसली, तरी भारतामध्ये पुढे जाण्याची क्षमता आणि बुद्धीमत्ता निश्चितच आहे. अमेरिकेतील सिलीकॉन व्हॅलीमधील निम्म्या कंपन्यामध्ये भारतीय तंत्रज्ञ महत्वाच्या पदी आहेत किंवा मालक आहेत. ह्या गोष्टीवरूनच भारताकडे उपलब्ध असलेल्या ज्ञानसाठ्यांची कल्पना येऊ शकेल.

जर आपल्याला नवीन युगात आत्मविश्वासाने प्रवेश करायचा असेल तर आपल्याला तंत्रज्ञानाकडे लक्ष द्यावे लागेल, शिक्षण, शैक्षणिक तंत्रज्ञान यांच्याकडे लक्ष द्यावे लागेल.

त्यासाठी आपल्याला मोठ्या प्रमाणार संगणक साक्षरतेची मोहीम हाती घ्यावी लागेल. संगणक साक्षरतेसाठी नव्या शैक्षणिक पद्धती विकसित कराव्या लागतील. याचा उद्देश केवळ मूठभर तज्ज्ञ तयार करणे असा न ठेवता व्यापक जनतेला संगणक साक्षर बनवणे असा असला पाहिजे.

एखाद्याला संगणक साक्षर व्हायचे असेल तर तो पुढील प्रमाणे साक्षर होऊ शकतो.

१) संगणक येणाऱ्या एखाद्या व्यक्तीची मदत घ्या.

२) तुमच्या विषयाला अनुरूप आणि तुमच्या पातळी प्रमाणे पुस्तके मिळवा. अशा प्रकारची भरपूर पुस्तके बाजारात सध्या उपलब्ध आहेत.

३) शिकताना काही प्रश्न समोर ठेवून शिका. पायरी पायरीने पुढे जा.

यांची अंमलबजावणी केल्यास तुम्ही निश्चितच संगणकाचे आवश्यक ते ज्ञान मिळवू शकाल, याची खात्री आहे.

**माहिती तंत्रज्ञान युगाचा उदय :**

जर आपल्याला माहिती युगाच्या मुळाशी जायचे असेल तर १९७० पासून घटनांचा मागोवा घ्यावा लागेल. जेव्हा नवीन तंत्रज्ञान हे विकसित होते तेव्हा ते जुडग्या जुडग्याने विकसित होते. १९७१ मध्ये मायक्रो प्रोसेसरचा जन्म झाला. मायक्रो प्रोसेसरचे उत्पादन १९७५ च्या सुमाराला सुरू झाले. १९७५ मध्ये मायक्रो कॉम्प्युटरचा उगम झाला. मायक्रो कॉम्प्युटर म्हणजे सध्याच्या आपल्या टेबलांवरील पर्सनल कॉम्प्युटर. त्या आधी संगणक म्हटलं की साधारण ३० टन वजनांचा, ९फूट उंचीचा, आख्खी खोली व्यापणारा असायचा. मायक्रो कॉम्प्युटरचा पहिला बाजारू अवतार ॲपल-२ या नावाने एप्रिल १९७७ मध्ये बाजारात आला. साधारण याच सुमारास बिल गेटस्च्या मायक्रो सॉफ्ट या कंपनीने पहिली ऑपरेटिंग सिस्टिम बाजारात आणली. ऑपरेटिंग सिस्टीममुळे पर्सनल कॉम्प्युटरचा व्यापक प्रमाणात वापर करणे शक्य झाले. १९६९ मध्ये औद्योगिक इलेक्ट्रॉनिक स्विच चा जन्म झाला. आणि १९७५ च्या सुमारास डिजीटल स्विच तयार करण्यात आला. स्विचींग च्या या तंत्रज्ञानामुळेच संपर्क तंत्रज्ञान विकसित होऊ शकेल. १९७० नंतर ऑप्टीक फायबर तंत्रज्ञानाचा उदय झाला. या तंत्रज्ञानाच्या आधारावरच आजचे इंटरनेट तंत्रज्ञान उभे आहे.

१९६९ साली अमेरिकेच्या लष्करी खात्याने एका 'नव्या इलेक्ट्रॉनिक संपर्क जाळ्याच्या' प्रकल्पावर काम करण्यास सुरुवात केली. याचेच पुढे इंटरनेटमध्ये रूपांतर झाले.

यावरून लक्षात येईल की १९७० पासून अनेक एकमेकामध्ये गुंतलेली तसेच एकमेकांवर अवलंबून असलेली नवी नवी तंत्रज्ञाने एका पाठोपाठ एक विकसित

---

स्वतःनिखाऱ्यातून चालतानाही आई मुलाला सुख मिळावं हे चिंतते.

होत गेली. यातूनच आजच्या व्यापक माहिती तंत्रज्ञानाचा विकास झाला आहे. माहितीच्या क्रांतीची सुरुवात बीजाच्या रूपाने १९७० च्या सुमारास झाली आणि त्यांची विस्फोटक वाढ आज आपल्या पुढे चालू आहे.

**तंत्रज्ञानाचा समाजावर परिणाम**

''तंत्रज्ञान स्वभावत:च चांगले किंवा वाईट नसते पण ते तटस्थ नक्कीच नसते.''

वरील वाक्य माल्विन क्रांजबर्ग यांच्या १९८५ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत आहे. हे अतिशय विचित्र पण समर्पक आणि अर्थगर्भ वाक्य आहे.

या वाक्याचा अर्थ काय ते आपण समजून घेण्याचा प्रयत्न करू. आधुनिक समाजामध्ये तंत्रज्ञानाचे स्थान आणि परिणाम यावर नेहमी बरीच उलट सुलट चर्चा चालते. छपाईचा शोध चीन मध्ये १४व्या शतकात लागला. पण छपाईचा व्यापक प्रमाणात उपयोग युरोप मध्ये झाला. सुमारे ५०० वर्षापूर्वी छपाईच्या सहाय्याने सर्वप्रथम बायबलच्या प्रति काढण्यात आल्या. यातून निर्माण झाला तो आधुनिक समाज आणि आधुनिक शिक्षण. याला पहिली माहिती क्रांती म्हणायला हरकत नाही. छपाईमुळे जशी ही पहिली माहिती क्रांती घडली तशीच दुसरी माहिती क्रांती डिजीटल तंत्रज्ञान आणि संगणक यामुळे सुरु झाली आहे.

छपाईच्या सहाय्याने चांगली पुस्तके छापता येतात तशी वाईट पुस्तके देखील छापता येतात. म्हणजे छपाई तंत्रज्ञान चांगलेही आहे आणि वाईटही आहे. पण छपाई तंत्रज्ञान तटस्थ नक्कीच नाही कारण त्यातूनच पहिली माहिती क्रांती घडली. संगणक तंत्रज्ञानाबद्दल देखील असेच म्हणता येईल. संगणक तंत्रज्ञानाच्या चांगल्या बाजूबरोबर वाईट उपयोगाबद्दल देखील आपण बरेच ऐकतो. पण संगणक तंत्रज्ञान आपल्याला ज्ञानाधारित अर्थव्यवस्था आणि ज्ञानाधारित समाज यांच्याकडे नेणार आहे हे देखील निश्चित.

**''ज्ञान हीच शक्ती आहे''**

फ्रॅन्सिस बेकनचे हे उद्गार आहेत. एकविसाव्या शतकात प्रवेश करताना त्याला वेगळेच महत्त्व आणि अर्थ प्राप्त झाला आहे.

आता ज्ञान म्हणजे आहे त्या परिस्थितीवर नियंत्रण मिळवावयाचे साधन राहिले नसून परिस्थिती बदलण्याचे हत्यार झाले आहे.

आज आपण दोन शतकांच्याच नव्हे तर दोन युगांच्या संधीकालात वावरत आहोत. ''अशा कालखंडात जगायला मिळणे हे देखील भाग्याचे तर तारुण्यात असणे तर अहोभाग्यच !'' हे इंग्लिश कवी बायरनचे उद्गार आताच्या काळाला अतिशय समर्पक आहेत. असे कालखंड मानवी इतिहासात वारंवार येत नसतात. पण या भाग्याचा उपयोग घेण्याच्या स्थितीत आपण आहोत का ?

हे युगांतर म्हणजे आपला औद्योगिक युगातून ज्ञानयुगात होत असलेला प्रवेश.

युरोपात औद्योगिक क्रांती झाली तेव्हा ती जगातील छोट्याश्या भागापुरती आणि थोड्याच लोकसंख्येपुरती सीमित होती. पण त्या बदलाने थोड्याच काळात जगाला अक्षरशः हादरवून सोडले. ज्या प्रदेशामध्ये प्रत्यक्ष बदल घडले नाहीत आणि जे भाग मागासलेले राहिले असे जगाचे कानेकोपरे देखील या बदलांपासून अलिप्त राहू शकले नाहीत. आपल्यावर काय आघात होतो आहे ते समजण्याआधी ते त्या वादळाच्या तडाख्यात सापडले.

आज देखील असेच घडत आहे. आपण एका युगांतराच्या उंबरठ्यावर उभे आहोत. जगात अमेरिका युरोपसारख्या प्रगत भागात जे बदल झपाट्याने होत आहेत. त्याचा परिणाम सर्व जगावर झाल्यावाचून राहणार नाही.

आता आपण सोळाव्या शतकात राहत नसून

---

आईच्या हातचा पदार्थ हा वाईट होऊच शकत नाही.

एकविसाव्या शतकात राहात आहोत. नव्या युगाला ज्ञानयुग म्हणून संबोधले जात आहे. ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेमुळे अनेक गंभीर आणि जीवघेणे प्रश्न निर्माण होणार असले तरी त्याचबरोबर अनेक नव्या संधी देखील पुढे येणार आहेत. 'ज्ञाना' चे शस्त्र सगळ्यांनाच कमीअधिक प्रमाणात उपलब्ध झालेले असणार आहे. त्याच्या आधारावर ही परिस्थिती बदलणे शक्य होणार आहे. मात्र त्यासाठी गरज आहे ती ज्ञानाधारित चळवळीची !

आता काळाचे भान ठेवले नाही तर आपल्या अस्तित्वालाच धोका निर्माण होईल. जेव्हा जेम्स वॅट वाफेचे इंजिन बनवत होता तेव्हा आपल्याकडचे राजेरजवाडे हत्तींवरून आपापसात लढाया खेळण्यात मश्गूल होते. काही ठराविक ठळक घटनांनी जरी आताचे बदल घडून येत नसतील तरी त्यांचे जगावर मूलगामी परिणाम होणार आहेत. म्हणूनच या बदलांचे नेमके स्वरूप समजणे अत्यावश्यक आहे. काळाचा महिमा ओळखला तर आपण साध्या पहारीने पहाड उलथवी नाहीतर त्याच पहाडाखाली चिरडून जाऊ.

नव्या शतकाचा आणि नव्या युगाचा संबंध असण्याचे काही कारण नाही. हा एक निव्वळ योगायोग असू शकतो. पण साधारणपणे असे म्हणता येईल की, मानवी समाजात नव्याने येणारे ज्ञानयुग आणि नवे एकविसावे शतक हे एकत्रित आले आहेत.

आपण नेमके ज्ञानयुगात केव्हा प्रवेश करू ते सांगणे अवघड आहे. एकविसाव्या शतकात प्रवेश करताना आपण ज्ञानयुगाच्या उंबरठ्यावर असू किंवा ज्ञानयुगात दाखल झालेले असू.

युगातरांच्या सीमा सुस्पष्ट नसून धूसरच असतात. त्यामुळे मानवी इतिहासात अनेक स्थित्यंतरे अमूक साली झाली असे सांगणे कठीणच असते. दुसरे म्हणजे आपण ज्या काळात वावरतो त्याचे नेमके विश्लेषण करणे कठीण होऊन बसते. वर्तमानात गुंतलेलो असल्यामुळे त्या काळाचे मूल्यमापन आपण तटस्थपणे करू शकत नाही. तो काळ उलटून गेल्यावर मागे वळून पाहिल्यावर सुस्पष्ट चित्र उभे राहाते.

येथे 'ज्ञान' या शब्दाकडे विस्तृत अर्थाने बघितले पाहिजे. भारतीयांना ज्ञान हे अतिशय मूलभूत स्वरूपाचे वाटते. आपल्या दृष्टीने ज्ञान हा ऋषीमुनी, शास्त्रज्ञ, विचारवंत यांचाच प्रांत आहे.

एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर इतर तंत्रज्ञानाबरोबर इंटरनेटच्या माहिती-संपर्काच्या महाजालाची वाढ आणि त्यातून माहितीचा प्रचंड विस्फोट आपल्या डोळ्यांसमोर होत आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात संगणकाचा वाढता प्रसार आणि त्यानंतर इंटरनेटच्या महाजालाचा उदय यामुळे जगातील ज्ञानभांडारे एकमेकाना जोडली गेली आहेत.

यातून माहितीवरील मक्तेदारी संपून माहिती सर्वांसाठी खुली झाली आहे. परिणामतः नव्या ज्ञानाचे आणि तंत्रज्ञानाचे नवनिर्माण ही मूठभरांची मक्तेदारी न राहता सर्वांना त्यात सहभागी होता येईल. आज अशी शक्यता निर्माण झाली आहे की उत्पादनात गुंतलेला सर्वसामान्य माणूस देखील ज्ञाननिर्मितीच्या आणि तंत्रज्ञानाच्या नवनिर्माणाच्या प्रक्रियेत भाग घेऊ शकेल. ज्ञानाची चळवळ ही जनतेची चळवळ होऊ शकेल.

ज्ञानयुगात अर्थव्यवस्थेचे केंद्रस्थान भांडवल आणि श्रम हेच न राहता ज्ञान आणि तंत्रज्ञानाचे नवनिर्माण यांच्याकडे सरकणार आहे. त्यामुळे भांडवल तुटपुंजे असले तरी ज्ञान आणि तंत्रज्ञानाचे नवनिर्माण यांच्या आधारे व्यक्तींना किंवा गटांना प्रस्थापित एकाधिकार तोडणे शक्य होणार आहे. मागसलेल्या समाजांना, देशांना हनुमान उडी मारणे शक्य होणार आहे.

---

संस्कारांचा ठेवा म्हणजे आई.

आज भारतीय शास्त्रज्ञ आणि तंत्ज्ञाना जगभरात अतिशय मानाचे स्थान आहे. अनेकांनी व्यक्तिगत प्रेरणेने परदेशात अतिशय मोलाची कामगिरी केली आहे. त्यापैकी काही जण व्यक्तिगत पराक्रमांनी उच्चपदीही पोहोचले आहेत. पण तरीही आज जयंत नारळीकर, रघुनाथ माशेलकर, विजय भाटकर, ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्यासारखे शास्त्रज्ञ कोणत्याही प्रलोभनांना बळी न पडता भारतात पाय रोवून प्रतिकूल परिस्थितीत संस्थांची उभारणी करीत आहेत. होमी भाभा, प्रशांतचंद्र महालनोबीस, विक्रम साराभाई यांची परंपरा त्यांनी आधुनिक काळात जिवंत ठेवली आहे.

त्यांना विशेष राजकीय, सामाजिक पाठबळ आहे असे नाही. पण त्यासाठी त्यांची अंत:प्रेरणा आणि देशाभिमान हेच मुख्यत: कारणीभूत आहेत.

जर आपल्या देशाने देश म्हणून वेळ्या काळाचे भान ठेवले, तर आपण मागासलेपणाची तटबंदी भेदून आणि मागील अनेक शतकांच्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जोरदार मुसंडी मारू शकतो.

पण यात प्रस्थापित किंवा नोकरशहा पुढाकार घेणार नाहीत. त्यासाठी आवश्यकता आहे वेगळ्याच प्रकारच्या जनजागृतीची आणि सामाजिक दबावाची.

ज्ञानाचा आणि नवनिर्माणाचा ठेका शास्त्रज्ञांनी आणि विचारवंतांनीच घ्यावा असे काही नाही. सर्वसामान्य जनता देखील या महायात्रेत सामील होऊ शकेल. नव्हे त्यांनी सामील व्हावे अशीच अपेक्षा आहे. किंबहुना सर्वसामान्यांच्या सहभागाशिवाय ज्ञानाधारित सामाजिक रचना यशस्वी होऊच शकणार नाही.

याचा अर्थ असा नव्हे की ज्ञानमय अर्थव्यवस्थेत काही प्रश्नच असणार नाहीत. ज्ञानावरील मक्तेदारी, ज्ञानाचे असमान वाटप हे आणि असे अनेक ज्वलंत प्रश्न निर्माण होऊ शकतील.

या प्रश्नांमुळे ज्ञानयुगाची सुरूवात आपल्याला सुखद असेलच असे नाही. किंबहुना आजच त्याचे फटके आपल्याला कळत-नकळत बसू लागले आहेत. सुसंघटित क्षेत्रांत वाढत चाललेली बेकारी, जागतिकरण आणि खुले आर्थिक धोरण यांचे तडाखे, टर्मिनेटर सारख्या जेनेटिक तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांना पारंपारिक बी बियाणापासून वंचित केले जाणे, देशाच्या शतकानुशतकांच्या पारंपारिक ज्ञानसंपदेच्या हक्कांची आंतरराष्ट्रीय चोरी, पर्यावरण्याच्या प्रश्नावर बड्या राष्ट्रांनी मागासलेल्या राष्ट्रांची चालवलेली गळचेपी, असे अनेक ज्वलंत प्रश्न आपल्यापुढे उभे आहेत.

या प्रश्नाकडे बघताना आपण जुन्याच पद्धतीने विचार करीत आहोत. पण ज्ञानाधारित अर्थव्यवस्था ही औद्योगिक अर्थव्यवस्थेची सुधारित आवृत्ती नसून तिच्यापेक्षा अधिक उत्क्रांत व्यवस्था आहे.

*( या लेखकद्वयीचे ''ज्ञानयुगाचे आव्हान'' या नावाचे पुस्तक अक्षर प्रकाशनातर्फे लवकरच प्रकाशित होणार आहे. नव्या शतकाला सामोरे जाताना ज्ञानयुगातील झंझावती बदलांना व्यक्ती, संघटना आणि समाज यांने कसे तोंड द्यावे याची चर्चा या पुस्तकात केलेली आहे - संपादक)*

लेखक

**अनिल शाळीग्राम**

**प्रशांत देशपांडे**

महापालिकेसमोर, ठाणे

फोन : ५३६ ३१२२

• • •

गंगेपेक्षा आईचे मन पावित्र्यात श्रेष्ठ आहे.

# सौरभ चुबे - आमचा अभिमान विषय

(ए.के. जोशी शाळेतील सौरभ चुबे याने गुणवत्ता यादीत २४वे स्थान पटकावून शाळेचा मान वाढवला आहे. याच शाळेतील ९वी 'अ' मधल्या विद्यार्थ्यांनी त्याच्या निवासस्थानी जाऊन त्याची मुलाखत घेतली. - संपादक)



सौरभ चुबे

"गुणवत्ता यादीत यश मिळाले" हे तुला पहिल्यांदा कसे कळले ? कळल्यावर कसे वाटले ?

सौरभ : - ११.३० वाजता मॅडमचा फोन आला तेव्हा अतिशय आनंद झाला.

प्रश्न :-यश अपेक्षित होते का ?

सौरभ :- गुणवत्तायादीत येईन असे वाटले नव्हते. पण ९०% च्यावर मिळतील असा विश्वास होता.

प्रश्न :-अभ्यास कशाप्रकारे केला ? प्रायव्हेट क्लासेसचा काही उपयोग झाला का ?

सौरभ :- सुरवातीला दररोज ५ ते ६ तास अभ्यास करायचो. प्रिलिम्स नंतर सुमारे ११ ते १२ तास अभ्यास केला. गणित व विज्ञानासाठी क्लास लावला होता. संस्कृतसाठीसुद्धा क्लासला जात असे. मी, मे महिन्यापासूनच अभ्यासाला सुरवात केली होती. धडा वाचून त्याखालची प्रश्नोत्तरे सोडवत असे. नियमित अभ्यास केल्याने जागरण करायला किंवा सकाळी लवकर उठायची कधीच गरज भासली नाही.

"फलश्रुती" ची टेस्ट सीरिज लावली होती. त्याचाही फार फायदा झाला.

प्रश्न :-भाषा सुधारण्यासाठी काय प्रयत्न केलेस ?

सौरभ :- सुरवातीला मी 'नवनीत' ची निबंधमाला वाचत असे आणि मग शेवटी मी निबंध लिहिले. सौ. सुमेधा कुलकर्णी व इतर शिक्षकांनी खूप मार्गदर्शन केले. वाचनालयाचा ही थोडा उपयोग झाला.

प्रश्न :-अभ्यासाव्यतिरिक्त इतर स्पर्धेमध्ये भाग घेतला होता का ?

सौरभ :- मला कॅसिओ वाजवायला खूप आवडते. मित्रांबरोबर खेळायलाही जात असे. मात्र इतर स्पर्धांमध्ये भाग घेतला नाही.

प्रश्न :-आजकाल पेपरचेकिंग बद्दल खूप काही ऐकायला मिळते, म्हणून तू निराश झाला होतास का ?

सौरभ :- आपल्याला मिळालेल्या यशामध्ये नशिबापेक्षा जास्त वाटा आपल्या मेहनतीचा असतो. असे म्हणतात ना,' 99% Perspiration 1% Inspiration" ! "मेरिटमध्ये येण्यासाठी नशीब लागतं. पण चांगले मार्क हे आपल्या मेहनतीवर अवलंबून असतात.

प्रश्न :-तुझे आदर्श कोण आहेत ?

सौरभ :- माझे आदर्श -माझे आई-वडिल व शिक्षक आहेत. त्याचप्रमाणे माझ्या मोठ्या वहिणीनेदेखील खूप मदत केली.

प्र :- चांगल्या उत्तरपत्रिकेचे रहस्य कोणते ?

सौरभ :- तयारी खूप हवी. आत्मविश्वास हवा. उत्तरपत्रिकेचे सादरीकरण (Presentation) चांगले हवे. इतर मुद्यांमध्ये लिहावे. प्रमुख मुद्यांना रेखांकीत करावे.

माणसाच्या जीवनाचे सार म्हणजे मातृत्व.

प्र :- शाळेमधे तुझी कामगिरी कशी होती ?

सौरभ :- पहिला नंबर माझा कधीच आला नाही. मी पाचवा किंवा सहावाच यायचो. प्रीलीम्समध्येही मला ८८% मार्क मिळाले होते.

प्र :- तुला ४थी व ७वी ची शिष्यवृत्ती मिळाली नाही. त्याने निराश झालास का ?

सौरभ :- चौथीत असताना मी अंधेरीला 'केंब्रीज' या शाळेत होतो. मी क्लासही लावला नव्हता आणि मला मार्गदर्शन नव्हते. ७वी ला ही मला शिष्यवृत्ती मिळाली नाही. 'होमी भाभा' मध्येही यश मिळाले नाही. म्हणून मी ठरवले होते की दहावी मध्ये चांगले गुण मिळवावयाचे.

प्र :- तुला ९०% मिळवूनही 'रुपारेल' मध्ये प्रवेश मिळाला नाही. यावद्दल तुला काय म्हणायचे आहे ?

सौरभ :- विज्ञान शाखा घेण्यासाठी ९०% आवश्यक होते. 'रुपारेल मधेही प्रवेश मिळाला नाही, रुईया पण काही वाईट नाही.

प्र :- आता पुढे काय करायचे ठरवले आहेस ? शिक्षणासाठी विदेशी जायचा विचार आहे का ?

सौरभ :- मी सध्या Indian Institute of Technology (I.I.T.)च्या प्रवेश परीक्षेसाठी बसलो आहे. विदेशी जाण्याबद्दल मी विचार केला नाही.

प्र :- शेवटी म्हणजे, सध्या दहावीच्या परीक्षेस बसलेल्या मुलांना तू कोणता संदेश देऊ इच्छितोस ?

सौरभ :- संदेश एवढाच की - चांगला अभ्यास करा. यश हे मेहनतीचे फळ आहे असते.

एवढे झाल्यावर आम्ही त्याला शुभेच्छा दिल्या व त्याचा निरोप घेतला.

**शीतल हळदवणेकर, अल्पना गुप्ते, मानसी बापट, प्रिया मराठे**
ए.के. जोशी हायस्कूल, ठाणे.

•••

हार्दिक शुभेच्छा !

कर्जत येथे, कर्जत वणेगाव रोडवर दुसरा माळा जागा त्वरीत विकणे आहे. रस्त्याकडील बाजू ८५० स्के. फी. हद्देशीर ब्लॉक, तसेच दहिवली येथे १रुम किचन १ला मजला. ३५० स्के. फी. विकणे आहे.

संपर्कासाठी पत्ता.
श्री. शशांक धर्माधिकारी
विशाल अपार्टमेंट, कोतवाल नगर, कर्जत.
फोन : ०२१४८ - २-२६२०

With Best Compliments From

A
WELL
WISHER

# मेघदूत - एक रसास्वाद

प्रा. (सौ.) सुनीता खरे
सहाय्यक ग्रंथपाल, मुंबई विद्यापीठ

*(मेघदूत. भारतीय साहित्याला समृद्ध करणारे संस्कृत काव्य. आज इतक्या वर्षांनी या काव्यातील गोडी संपलेली नाही. या दृष्टीने रसिक मनाने केलेले हे रसग्रहण - संपादक)*

आपल्या पुराणांतील कल्पनेनुसार पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर तसेच आग्नेय, ईशान्य, वायव्य व नैऋत्य ह्या आठही दिशांचा एकेक अधिपती आहे. अष्टदिशांच्या ह्या आठ अधिपतींना अष्टदिक्‌पाल म्हणून संबोधतात. उत्तर दिशेचा अधिपति कुबेर. तो यक्ष आणि किन्नरांचा राजा. अफाट संपत्तीचा धनी. हिमालय पर्वतावरील अलकानगरी ही त्याची राजधानी. ह्या राजधानीत असलेल्या त्याच्या उद्यानाचे नाव चैत्ररथ. रोज सकाळी त्याला देवांच्या पूजेसाठी कमलपुष्पे लागत. ती चैत्ररथ ह्या उद्यानांतून रोज पहाटे ताजी मिळावीत म्हणून त्याने ही फुले आणण्यासाठी एका यक्षाची नेमणूक केली. रोज पहाटे उठून ताजी कमळे त्याने पूजेसाठी कुबेराला आणून द्यायच हे त्याचे काम. रोज हे काम तो इमानेइतबारे करीत असे. असे काही दिवस गेल्यावर त्या यक्षाचा विवाह झाला. आता कमळांकरिता रोज पहाटे आपल्या नवपरिणीत पत्नीपासून दूर होणे त्याला त्रासाचे वाटू लागले. काय करावे अस विचार करता करता त्याला एक युक्ती सुचली. त्याने एकदा सायंकाळींच सरोवरातील कमळे तोडून ठेवली. या कमळांपैकी एका कमळांत एक भुंगा अडकलेला होता. सूर्यविकासी जी कमळे असतात तीं सूर्यास्ताबरोबर मिटतात व काहीं वेळा मधुप्राशनमग्न भुंगे त्यांत अडकतात. दुसऱ्या दिवशी अरुणोदयाबरोबर हीं कमळे जेव्हा पुन्हा फुलतात तेव्हाच ते अडकलेले भुंगे बाहेर येऊ शकतात. आता काय झालें की सायंकाळी तोडलेली कमळे यक्षाने कुबेराला नेऊन दिली. पूजेच्या वेळी त्यातील एक कमळ त्याने उचलले तर त्यातील भुंग्याने कुबेराच्या बोटाला जोराने दंश केला. कुबेर रागावला व त्याने यक्षाला बोलावून ही फुले तू केव्हा तोडलीस अशी विचारणा केली. कारण कळल्यावर त्याने यक्षाला असा शाप दिला की "ज्या प्रियेपासून दूर होण्याचे टाळण्याकरिता तू आपल्या दैनंदिन कर्तव्याला चुकलास त्या तुझ्या प्रियेपासून तू एक वर्ष दूर राहशील व तुझ्या अणिमा, गरिमा इ. सिद्धीही तुला त्या काळात वश असणार नाहीत." ह्या शापवाणीशी ही रम्य कथा संपते आणि तेथूनच कालिदासाच्या मेघदूत ह्या रसिकप्रिय कथेचा प्रारंभ होतो. मेघदूताचा पहिला श्लोक असा आहे-

'कश्चित्कांता विरहगुरुणा स्वाधिकारात्प्रमत:
शापेनास्तंगमित महिमा वर्षभोग्येण भर्तु : ।
यक्षचक्रे जनकतनया स्नानपुण्योदकेषु
स्निग्धच्छाया तरुषुवसतिं रामगिर्याश्रमेषु ॥

मेघदूताचा नायक 'एक यक्ष' त्याच्याकडून त्याच्या स्वामीकार्यात चूक घडल्यामुळे मिळालेला एक वर्ष पत्नीविरहाचा शाप भोगण्यासाठी आपल्या सर्व सिद्धीविरहित होऊन अलकेहून रामगिरीवर येऊन एका आश्रमांत एकटा राहू लागतो ही मेघदूताची सुरुवात.

अस म्हटल जात की कविप्रतिभेचा निम्मा उपयोग, विषयांचा व शब्दांचा अनावश्यक फापटपसारा वगळण्यात असतो. मेघदूतांत कालिदासाने कित्येक गोष्टी वर्णन करुन सौंदर्य आणले आहे पण तसेच सौंदर्य कित्येक गोष्टी वर्णन करण्याचा मोह टाळून त्याने उत्पन्न केले आहे. एखाद्याने मेघदूताचा नायक जो यक्ष त्याला एखादे सुंदर नाव दिले असते, त्याच्या प्रियेचे नाव सांगितले असते, यक्षाला शाप

आईची खरी किंमत आई गेल्यावरच कळते.

कसा आणि का मिळाला त्याचे वर्णन केले असते. पण चतुर कालिदासाने यातील कोणतीही गोष्ट केली नाही. यक्षपत्नीलाही त्याने मेघदूताच्या रंगमंचावर आणले नाही. यक्षमुखातून तिचे वर्णन तेवढे काव्यात येते. ती पडद्याआडच असली तरीही तिने संपूर्ण मेघदूत व्यापून टाकले आहे. काही टीकाकारांचे मत तर अस आहे की कालिदासाने लिहिलेले मेघदूत सुंदर आहे पण त्याने न लिहिलेले मेघदूतही तितकेच सुंदर आहे.

मेघदूत हे खंडकाव्य म्हणजे कालिदासाच्या अनुपम प्रतिभेचा विलास होय. कवि कुसुमाग्रज यांनी एकदा असे म्हटले होते की " एखाद्या निर्जन बेटावर जाताना एकच काव्य बरोबर नेण्याचे बंधन जर माझ्यावर घालण्यात आले तर मी मेघदूत काव्याची निवड करीन." १२१ श्लोकांचे हे खंडकाव्य अत्यंत लोकप्रिय असून १९६४ पर्यंत त्याच्यावर सुमारे ५० टीका लिहिल्या गेल्या होत्या. तिबेटी व सिंहली भाषेत त्याचे अनुवाद झाले आहेत. मराठीतही कुसुमाग्रज, सी.डी.देशमुख, शांता शेळके, वा.भ. बोरकर अशा थोर थोर लेखकांनी मेघदूताचा अनुवाद केला आहे. संस्कृतांत तर मेघदूत हा आदर्श मानून संदेश काव्यांची एक परंपराच पुढे सुरु झाली आणि पवनदुत, नेमिदूत, उध्दवदूत,हंसदूत इत्यादि काव्ये जन्माला आली. काव्याची रचना करण्यासाठी मंदाक्रांता वृत्तीची निवडही कालिदासाने चातुर्याने केली आहे. मंदाक्रांता हे वृत्त वर्षाऋतूचे, प्रवासाचे किंवा संकटाचे वर्णन करण्यासाठी अत्यंत योग्य समजले जाते. (प्रावृट् प्रवास व्यसने मन्दाक्रान्ता विराजते । ) त्याची मंद गति ह्या तीन विषयांच्या वर्णनास अत्यंत उपयुक्त अशी आहे आणि मेघदूतकथेमध्ये हे तीनही वर्ण्यविषय आहेत.

मेघदूतामध्ये कालिदासाने शृंगार रसाच्या भिन्न भावच्छटा समर्थपणे व त्या त्या छटेस साजेशा शब्दयोजनेने चितारल्या आहेत. प्रसाद, माधुर्यादि गुणयुक्त वर्णनपद्धति, उपमा, अर्थान्तरन्यास इत्यादी अलंकार मार्मिकतेने योजण्यांतील चातुर्य इत्यादि सर्व कालिदासीय गुणविशेष आपल्याला मेघदूतात पहावयास मिळतात. मेघदूतांतील एकेक श्लोक हा अत्यंत तेजस्वी असा पैलूदार हिराच आहे. फौशे नावाच्या एका जर्मन ग्रंथकाराचं तर असं मत आहे की "युरोपीय विरहवाङ्मयांत कालिदासाच्या मेघदूताप्रमाणे सर्वांग सुंदर काहीही नाही."

शापामुळे आपल्या प्रियेपासून दूर रहाणारा, विरहाने व्याकुळ झालेला यक्ष आषाढाच्या पहिल्या दिवशी पर्वतशिखराकडे पहात शून्यमनस्क असा बसला असतांना पर्वतशिखराला बिलगलेला असा मेघ त्याला दिसला. पर्वत शिखराला आपल्या सुळ्यांनी ढुशा देण्यासाठी वाकलेल्या हत्तीप्रमाणे तो अतिशय रम्य दिसत होता. वर्षाऋतूतील मेघदर्शनाने सर्वच प्रेमिकांचे चित्त अस्वस्थ होते. येथे तर प्रिया शेकडो कोस दूर होती. त्यावेळी दळवळणाची किंवा संपर्काची आजच्यासारखी साधनेही उपलब्ध नव्हती, की पटकन फोन करु आणि तिची खुशाली विचारु. आपली विरहव्यथा थोडी कमी करु हे तर शक्य नव्हते. पण मेघदर्शनाने यक्षाला एक कल्पना सुचली - 'ह्या मेघाबरोबर आपण-आपल्या प्रियेला संदेश का पाठवू नये ? ' येथे कालिदासाचे मानवी मना बाबतचे सूक्ष्म निरीक्षण त्याच्या कामाला येते. तो म्हणतो, " मदनाने व्याकुळ झालेले लोक सचेतन आणि अचेतन वस्तूंमधील फरक जाणण्यास असमर्थ झालेले असतात' म्हणून अचेतन मेघ निरोप्या कसा होईल अशी शंका यक्षाला आली नाही. अशा प्रकारे अचेतन वस्तूवर सचेतनत्वाचा आरोप मेघदूतांतून कालिदासाने अनेक वेळा केलेला आहे पण मेघदूताची ही सुरुवातच कालिदासाच्या तरल, संवेदनक्षम मनाची खूण पटविण्यास समर्थ आहे. नवपरिणीत जोडप्यांतील विरही नायक, तोही यक्ष (जे अत्यंत विलासप्रिय समजले जातात.) शिक्षेचे ८ मास उलटून गेले आहेत. यक्ष अगदी दुर्बळ झाला आहे. ज्यावेळी सतत प्रियेची आठवण व्हावी असा काम उद्दिपित करणारा वर्षाऋतू. ह्या ऋतूच्या

---

आईची आठवण येत नाही असा एक ही क्षण आयुष्यात असू नये.

आगमनाबरोबर दूरदेशीं गेलेले पतीही लगबगीने स्वगृही परततात. त्यात आणखी धुवांधार वर्षा करणारा आषाढमास सुरु होत असलेला. अशी ही सर्व वातावरण निर्मिती करुन कवी यक्षाच्या मेघसंदेशाला सुरुवात करीत आहे.

कित्येक योजने दूर असलेल्या आपल्या प्रियेकडे आपला संदेश घेऊन जा अशी विनंती यक्ष मेघाला करणार आहे. त्यासाठी तो प्रथम मेघांचे प्रियाराधन करतो, त्याच्या कुळाची थोरवी वर्णन करतो, त्याची थोरवी वर्णन करतो, त्याला कुडाची फुले व पाणी असे अर्घ्यप्रदान करतो व मग त्याला आपली इच्छा सांगतो. अलकानगरीत जाण्यासाठी मेघाला कोणत्या मार्गाने जावे लागेल ते सांगतो. पूर्वमेघांत रामगिरीपासून अलकेपर्यंतच्या मार्गावर लागणारे पर्वत, नद्या, देश, नगरे, वने, उपवनें ह्यांचे अत्यंत रमणीय वर्णन येते. ह्या सर्व प्रदेशांचे वर्णन भौगोलिक दृष्ट्या बिनचूक तरीही इतके रसाळ आहे कीं सांगता योग्य नाही. मगघाने कसे कसे जावे, कुठे वर्षाव करावा, कुठें पर्वतावर विश्रांती घ्यावी, कोठल्या नदींचे रसपान करावे, मार्गांत कशी सृष्टिशोभा दिसेल, हंस व बगळे मेघाला कशी सोबत करतील, मेघाच्या आगमनाने आनंदित होऊन मोर त्याला नृत्याचा नजराणा कसा देतील, मार्गांत कोठे पवित्र मंदिरे आहेत, लक्ष्मीने व विलासानें शोभणारी नगरे आहेत इ.इ. सर्व तपशील कालिदास अत्यंत बहारीने रंगवितो. त्याची लेखणी चित्रकाराच्या कुंचल्याप्रमाणें हुबेहुब चित्रें रेखाटीत जाते. तो वर्णन करतो - चर्मण्वती नदींचे पात्र खूप रुंद आहे परंतु आकाशांतून ते पाहिले असता एखाद्या पांढऱ्या पट्ट्यासारखे चिंचोळे दिसते. मेघा, तुझा वर्ण निळा आहे. या नदींचे पाणी प्राशन करण्यासाठी तूं तिच्याजवळ गेलास म्हणजे आकाशांतून तो नदीचा स्वच्छ प्रवाह व त्याच्यामध्ये निलवर्णाचा तूं म्हणजे मोत्यांच्या हारांमध्ये इन्द्रनीळ मणि असावा तसे हे दृश्य दिसेल. महाकालाच्या देवळातील सायंकाळच्या पूजेचें वर्णन असेच बहारीचे आहे.

उत्तरमेघात अलकेचे वर्णन करतांना तर कालिदासानें आपली कल्पना स्वैर सोडलेली दिसते. अलकानगरीत सर्व गोष्टी सर्वकाळ मिळतात. नलिनी नेहमीं कमळांनी बहरलेल्या व हंसांच्या थव्यांनी वेष्टिलेल्या असतात, वृक्ष नेहमी फुललेले असतात, पाळीव मोरांचे पिसारे सदैव लखलखत असतात. रात्री चांदण्यानें न्हाऊन निघालेल्या असतात. प्रिय व्यक्तीशीं मीलन होताच शमणाऱ्या मदन तापावाचून दुसरा कोणताही ताप अलकानगरवासियांना माहीत नाही. व तारुण्याशिवाय वयाची दुसरी अवस्था त्यांना नाही. येथील उंचउंच वाड्यांच्या गच्च्या स्फटिकमण्यांनी खच्चून भरलेल्या असतात. आकाशांतील तारकांची प्रतिबिंबे त्यामध्ये पडतात, ती पाहून असे वाटते की येथे कोणीतरी फुलेच उधळली आहेत. येथील मंडळी पितात ते मद्य तरी कोणते म्हणाल तर ते असते कल्पवृक्षांतून निघालेले रतिफल नावाचे मद्य.

मेघाचा प्रवास अलकानगरीत आल्यावर संपेल. मग त्यानें यक्षाचे घर कसे ओळखावे याबद्दल कांहीं खुणा यक्ष सांगतो. कुबेराच्या राजवाड्याजवळ उत्तरेला माझे घर आहे. दारावर सुंदर कमान आहे. अंगणात माझ्या प्रियेने मुलगा मानून वाढविलेला लहानसा मंदारवृक्ष आहे. त्याच्या फुलांचे घोस हातांनी सहज तोडता येतील. अंगणांतील पुष्करणीच्या पायऱ्या पाचूच्या आहेत. ती सुवर्णकमळांनी आच्छादून गेलेली असते. त्या कमळांची देठे रत्नांच्या रंगाची आहेत. तिच्या पाण्यात हंस रहातात. तिच्या कांठावरील क्रीडा पर्वतांचे शिखर इंद्रनीलमण्यांनी बनविलेले आहे इ.इ. नंतर यक्षपत्नीचे वर्णन येते. ती सडपातळ, पिकल्या तोंडल्याप्रमाणें अधरोष्ठ असलेली, सिंहकट, चंचल दृष्टीची अशी मूळची फार सुंदर पण आता विरहामुळे झुरणीस लागलेली असेल. ती देवतेची पूजा करीत असले किंवा माझे चित्र रेखाटण्यात जीव रमवीत असले, पिंजऱ्यातील सारिकेजवळ माझी आठवण काढीत असेल किंवा माझे नाव गुंफलेले स्वरचित गीत वीणेच्या

सहाय्याने गाऊ पहात असेल व अश्रू ढाळीत असेल. वियोगाचे किती दिवस उरले ते मोजीत असेल किंवा आमची भेट झाल्यावर काय बोलावे ह्याचा विचार करीत असेल. तिचे दिवस कामधामात असतील परंतु रात्रीं तिचे दुःख उफाळून येत असेल. तू घराच्या गवाक्षात जाऊन उभा रहा व रात्रीच्या वेळींच माझी खुशाली सांगून तिला आनंदित कर. पण बघ हो ! ती जर निद्राधीन असेल तर गडगडाट न करता ती तिच्या जागे होण्याची वाट बघ. निद्रेमध्ये ती नक्कीच मला कडकडून भेटत असेल.

तुझा पती रामगिरीवरील आश्रमात सुखरूप आहे असें तूं तिला सांग. तिला म्हणावें विरहावस्थेमध्ये तुझ्या सौंदर्याचा एकेक अंश मला निसर्गांत दिसतो. हरिणीच्या दृष्टींत तुझे नेत्रकटाक्ष दिसतात. चंद्राच्या जागीं तुझा मुखचंद्र दिसतो. मोराच्या पिसाऱ्यांत मी तुझ्या फुले गुंफलेल्या केशकलापाची कल्पना करतो. तुझें चित्र काढून मी मन रमवू पाहतो पण डोळ्यांतील आसवांमुळें माझी दृष्टी झाकळून जाते. उत्तरेकडून येणाऱ्या वाऱ्याच्या स्पर्शाने मला असे वाटते की याच वाऱ्यांनी येथे येण्यापूर्वी तुझ्या अंगाला स्पर्श केला असेल. माझा शाप संपून तुझी माझी भेट झाल्यावर 'आपण हे करावे, ते करावे ' असे अनेक मनोरथ मी करीत असतो. तू ही धीर सोडू नकोस कारण सुख व दुःख चक्रनेमिक्रमाने येत असतात. शाप संपून आपण दोघे भेटलो म्हणजे आतां संकल्प केलेल्या विविध मनोरथाचनी परिपूर्ति करु. त्या रात्री शुभ्र शारदीय चांदण्यानें उजळलेल्या असतील.

हे मेघा, तू माझा निरोप माझ्या प्रियेला दे व लगेच परत फीरं तिची खुशाली समजली म्हणजे मला बरें वाटेल. तुजजवळ चातकांनी याचना केली की तू त्यांना पाणी देतोस म्हणूनच तुझ्या ह्या कनवाळू वृत्तीमुळेच तू माझी विनंती मान्य केली आहेस असे मी समजतो. माझे हे एवढे काम तूं कर. परमेश्वराजवळ माझे असे मागणे आहे की जशी माझी व माझ्या प्रियेची ताटातूट झाली आहे तशी तुझी व तुझ्या प्रियेची कधीही, क्षणभर न ही होवो.

अत्यंत समृद्ध अशा जीवनानुभवातून अशा प्रकारचीं भावनोत्कट काव्यें जन्माला येतात. कित्येक शतकांनंतरही तीं आज आपल्याला जणू आपलेच अनुभव साकारीत आहेतशीं भासतात. इतकी ती जिवत असतात. भोगाने नव्हे तर विरहाने प्रेम कळते, वाढते हे प्रेमाचे व मनुष्य स्वभावाचे गूढ कालिदासाने उकलले आहे. खरे तर हे भावनोत्कट काव्य जे एकदा उमलले ते पुन्हा मिटलेच नाही. यक्षाप्रमाणेच जणूं मेघदूत या काव्याला यौवनाखेरीज दुसरे वय माहीत नाही. शतके उलटली तरी अजूनही रसज्ञांचे थवे त्यावर तुटून पटत असतात. काव्याचा व रसिकांचा असा समासमा संयोग कवितच घडलेला दिसून येतो. पूर्वी कवींच्या गणनाप्रसंगी सार्थ ठरलेली अनामिका अजूनही तशीच आहे. पुष्कळ कवी झाले, पुष्कळ दूरकाव्येही झाल पण मेघदूत ते मेघदूत आणि कालिदास तो कालिदास. कवि कुलगुरु ही उपाधी मिरविणारा हा कवि संस्कृत वाचनाची मुशाफिरी म्हणजे एक आनंदयात्रा बनवितो आणि अत्यानंदाचे अनंत क्षण पदरात टाकतो. जगाच्या सांस्कृतिक इतिहासामध्ये ज्या फार थोड्या लेखक कविरत्नांना देशकालातीत लोकप्रियता लाभली त्यांच्यामधील कालिदास हा मेरुमणि होय. त्याची प्रतिभा केवळ आपणा पौरस्त्यानाच वंदनीय वाटते असे नाही तर त्याच्या मूळ कलाकृतींचा अथवा भाषांतरित कलाकृतींचा आस्वाद घेऊन पाश्चात्य पंडितानीही त्याचे श्रेष्ठत्व आनंदाने मान्य केले आहे. हेच त्याचे विश्वकवित्व होय.

सौ. सुनीता खरे
७/१३ जय हनुमान सोसायटी, परांजपे 'बी' स्कीम, रोड नं. ४, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७.

• • •

सर्व जगाशी प्रतारणा करा पण आईशी नको.

# दत्तसंप्रदाय आणि उपासनामार्गाचे ध्येय.

श्री. सुरेंद्र शं. हिर्लेकर

*(डिसेंबर महिन्यात होऊन गेलेल्या दत्तजयंतीच्या निमित्ताने दत्तसंप्रदायाबाबत माहिती देऊन विचारप्रवृत्त करेल असा लेख येथे देत आहे. - संपादक)*

भारतीयांच्या जीवनाचा विकास हा त्रीपर्वात्मक आहे. कर्मकाण्ड, उपासनाकाण्ड आणि ज्ञानकाण्ड हे तीन पर्व होत. कर्मकाण्डाने चित्तशुद्धी, उपासनेने चित्तैकाग्य आणि ज्ञानाने सकल वासनांचा क्षय झाला म्हणजे जीवनाच्या विकासाचे वलय पूर्ण होते.

वेदकाळात कर्मबहुल अशी यज्ञसंस्कृती होती. या यज्ञसंस्कृतीत उपासना पल्लवीत झाली आणि पुढे त्या उपासनेलाच ज्ञानाचा मोहोर आला. अशा रितीने कर्म, उपासना आनि ज्ञान ही एकातून एक अशी क्रमाने निर्माण होऊन या सर्वांची परिणती शेवटी पूर्णतेत झाली.

यज्ञ ही सामाजिक व राष्ट्रीय स्वरुपाची संस्था आहे. त्या मुळे सामाजिक अगर राष्ट्रीय जीवनांत यज्ञाची जेवढी गरज तेवढीच वैयत्तीक जीवनात उपासनेची गरज आहे. उपासना ही अंतर्मुख आहे तर यज्ञ हा बहिर्मुख आहे. यज्ञ हा जीवनवृक्षाचा विस्तार मानला तर उपासना ही त्या वृक्षाची मुळे मानावी लागतील. यज्ञ हा अनेकांनी मिळून केला जातो तर उपासना ही केवळ एकट्यानेच पार पाडावयाची. बहिर्मुख इन्द्रीयप्रवृत्तींना यज्ञ हा स्वभावतःच सुलभ वाटत असला तरी उपासना ही अंतर्मुख म्हणून तितकीच कठीण आहे. असा हा कर्मकाण्ड आणि यज्ञकाण्ड यांच्यातला फरक असला तरी दोहोत एक असे साम्य आहे की कर्म काय किंवा उपासना काय ही करण्याजोगी म्हणजे अनुष्ठेय अशी साधने आहेत. तसे ज्ञानाचे नाही. ते आचरणीय किंवा अनुष्ठेय नसते तर ते निव्वळ ज्ञेय असते. म्हणून ज्ञानयोगी, यज्ञ आणि उपासना यांच्या पलिकडचा असतो. यज्ञ आणि उपासना यांच्या पलिकडे गेलेले असे ज्ञानयोगी हे मानवतेचे भूषण होते.

उपासनामार्ग हा भारतीयांच्या जीवनात एकरुप होऊन गेला आहे. कारण उपासना करण्याचे प्रकार बुहविध झाले. उपासनेने नाना मार्ग निर्माण झाले तरी मूळ उपासनेचे स्वरुप मात्र बनलेले नाही. त्यामुळे कोणत्याही मार्गाने गेले तरी शेवटी उपासनेच्या मूळ गंगोत्रीकडे येऊन पोहोचतात. सगुणउपासना, निर्गुणउपासना आणि भक्तीचे नवविध प्रकार हे सर्व उपासना क्षेत्रांतील विविधप्रांत अधिकारुनुप निर्माण झाले आणि जीवनांत सर्व क्षेत्रांतील आ-पार जनांचा जीवन साफल्याचा मार्ग मोकळा झाला. भारतातील सांस्कृतिक एकता याच उपासना मार्गामुळे टिकली.

अशा या उपासना संप्रदायात दत्तसंप्रदाय हा सर्वांत प्राचीन व सर्वात लोकाभिमुख असा आहे. इतर संप्रदायाहून या संप्रदायाचे खास वैशिष्ट्य म्हणजे तो समन्वयवादी आहे, समन्वय या संप्रदायाचा तो आत्मा आहे. या संप्रदायात प्रवृत्तीची गंगा, निवृत्तीची यमुना आणि ज्ञानाची सारस्वती यांचा सुंदर त्रिवेणीसंगम झाला आहे. त्यामुळे ज्ञानदेवांनी म्हटल्याप्रमाणे-

*म्हणोनी भलतेणे एथ सदभावे नाहावे ।*
*प्रयागमाधव विश्वरुप पहावे ।*
*येतुलेनी संसारासी द्यावे । तिलोदक ॥*

असाच हा संगम आहे.

---

आईच्या दूधातूनच संस्कार दिले जातात.

या संप्रदायाचा प्रमुख ग्रंथ जो गुरुचरित्र त्यात शिव आणि विष्णू या संबंधी ऐकात्मता भाव वर्णिला आहे. हा संप्रदाय अर्थातच दत्तापासून झाला आहे. दत्त हा अनुसयेचा पुत्र व अत्रि महर्षी हे त्याचे वडील. त्याची माता हि 'कुणाची आसुया म्हणजे मत्सर न करणारी' म्हणून जशी अनुसूया तसेच अत्रि हे 'त्रिगोद्भव विकार जेथे नाहीत. त्री म्हणजे त्रिगोदभ् भाव विकार व अ- म्हणजे नाही' म्हणून अत्री या नावाने प्रसिद्ध आहेत.

अध्यात्मिक क्षेत्रांतील उपासनेने विविध प्रवाह व संप्रदाय जसे दत्तसंप्रदायात एकरुप होतात तसेच लौकीक क्षेत्रांतील सामाजिक, राजकीय व त्या अनुषंगाने निर्माण होणारे अनेक प्रवाह हे ही याच संप्रदायात एकरुप होतात.

निसर्गात कोणत्याही गोष्टीचा अविष्कार हा कधीच प्रयोगशून्य असत नाही. निसर्गाचा तो सिद्धान्त आहे. निसर्ग हा प्रकृतीधर्मावर अवलंबून असतो, आणि प्रकृती ही परमशक्तीने ओत-प्रेत अनुप्रमाणित असल्याने निसर्गातील हालचाली या अत्यंत क्रमबद्ध आणि नियमबद्ध अशाच असतात. लहान मुंगी पासून ते अनंत कोटी ब्रम्हांडापर्यंत सर्व काही शिस्तबद्ध व क्रमबद्ध असे आढळून येते. तो त्या परमात्मशक्तीच्या सहेतुक नियंत्रणामुळेच !

दत्तात्रेयाच्या नांवातच दान हा अर्थ सामावला असून, परमात्मशक्तीने दिला म्हणूनच त्याला दत्तात्रय किंवा दत्त अशी यथार्थ संज्ञा प्राप्त झाली आहे. अत्रिला दिला म्हणून तो आत्रेय असा पुत्र. हा दत्त दान दिलेला म्हणून दत्तात्रेय झाला. याचा अर्थ असा की दत्त स्वत: आयोनिज आहे. अनुसुया आणि अत्रि ही त्याची मातापितरे, जन्म-जनक संबंधामुळे झाली नव्हती. तर परमशक्तीच्या दानामुळे झाली होती. दानापासून दत्तावतार झाला म्हणूनच की काय हा संप्रदाय संग्रहप्रधान नसून त्याग प्रधान आहे. 'अवधूत' हे विशेषण याच दृष्टीने दत्ताला लावले आहे. ते योग्यच वाटते. तर मग अ व धू त या चार अक्षरांचा अर्थ असा -

अ आशापाशविनिर्मुक्तो आदिमयान्त निर्मलः ।
आनंदे वर्तेन नित्यमकारं तस्य लक्षणम् ॥

व वासना वर्जिता येत वक्तव्यं च विरामयम् ।
वर्तमानेषु वर्तते वकारं तस्य लक्षणम् ।

धू धूलीधूस क्षात्राणी धूतचित्तो निरामय : ।
धारणाध्यान निर्मुक्तो धूकारस्तस्य लक्षणम् ॥

त तत्वचिन्ता धुता येन चिन्ताचेष्टा विवर्जिता ।
तमोऽहंकार - निर्मुक्तस्त कातस्तस्य लक्षणम् ॥

अ - व - धू - त या शब्दातील प्रत्येक अक्षराचे लक्षण आपणाला वरील श्लोकात दिसले आहे. या लक्षणात मानवतेचा आदर्श सर्व दिशांना पोहोचला आहे. अवधूताचे स्वरुप, त्याचे रहाणे, बोलणे, वागणे या सर्वांचे मोठे मनोज्ञ वर्णन या चार अक्षरात आले आहे. असे हे अवधूत विशेषण ते स्वयमेव विशेष्य बनले आहे.

समर्थसंप्रदाय, आनंदसंप्रदाय, चैतन्यसंप्रदाय इ. विविध नावानी प्रसिद्ध असलेल्या उपासनाप्रवाहांशी दत्तसंप्रदायाची गंगा, एकरुप झाली आणि सर्वांनाच एका विशुद्ध ईशभक्तीचे पसायदान या संप्रदायाने केले. जातपात, धर्म यांचा कोणताही अडसर या संप्रदायात नाही. केवळ माणूस हा माणूस असावा एवढीच किमान अपेक्षा या संप्रदायाने बाळगली आहे.

अशा या दत्तसंप्रदायात उपासनेला फार महत्त्व आहे. या उपासनामार्गाचे ध्येय कोणते असावे. या संबंधात थोडक्यात सांगण्याचा एक प्रयत्न. मनुष्याचे जीवन म्हणजे सुख आणि दुःख यांच्या पाठशिवणीचा खेळ आहे. सुखापाठोपाठ दुःख आणि दुःखापाठोपाठ सुख ! अशी मण्यांची लांबलचक ओवलेली माळ. म्हणूनच संत तुकाराम म्हणतात -

---

घार हिंडते आकाशी तिचे चित्त पिलापाशी.

*सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वताएवढे ।*

तर मग प्रश्न पडतो की सुख आणि दुःख म्हणजे काय ? तर दुःखाची व्याख्या ' प्रतिकूल वेदनीय दुःखम् ।' अशी केली जाते. म्हणजे न आवडणाऱ्या वस्तूंशी संबंध येऊन प्रतिकूल संवेदना होणे याचे नाव दुःख होय. आणि सुख म्हणजे आवडणाऱ्या वस्तूंशी संबंध येऊन अनुकुल संवेदना होणे म्हणजे 'अनुकुल वेदनीय सुखम् ।'

या जगात जन्मला येणारा प्रत्येक मनुष्य सुखाच्या प्राप्तीसाठी अहोरात्र धडपडत असतो. परंतु या संसाररुपी सागरात सुखाचे मोती कमी असल्याने बहुधा दुःखाच्या शिंपल्याच अधिक प्रमाणात येतात. याचे कारण आपण ज्याला सुख म्हणतो ते वस्तुतः निर्भेळ सुख कधीच नसते. त्या सुखाच्या वस्त्राला दुःखाचा एखादा तरी धागा असतोच. म्हणूनच आपण ज्याला सुख म्हणतो ते वस्तुतः शाश्वत कधीच नसते. याचे कारण आपणाला आहे त्यात समाधान कधीच वाटत नाही.

उदाहरणार्थ सुखाच्या प्राप्तीसाठी एखादा मनुष्य सुंदर घर बांधतो व त्यात राहू लागतो. प्रथम त्याला कांही दिवस त्या घरात रहाण्यास मोठे सुख वाटत असते. आजूबाजूचे लोक दाटीवाटीने रहात असलेले पाहून त्याला स्वतःच्या ऐसपैस घरात रहाण्यात मोठे सुख वाटते. परंतु ज्या वेळी तो स्वतःच्या घरापेक्षाही अधिक सुखसोयींनी युक्त असे दुसरे घर पहातो त्या वेळी त्याच्या मनात पुन्हा दुःखच निर्माण होते. थोडक्यात सांगायचे तर या जगात ज्या काही गोष्टी सुखमय वाटतात त्यांच्यापासून होणारे सुख हे क्षणीकच !

विषयांचा उपभोग घेतानाही त्या पासून निर्माण होणाऱ्या क्षणीक सुखसंवेदनेने आपण इतके भारावून जातो की त्या पासून होणाऱ्या अंतिम परिणामाचा विचारही आपण करीत नाही. परंतु शांत मनाने विचार तर आपल्याला असे दिसून येईल की आपण सुख म्हणतो ते सुख परिणामकारी दुःखकारकच आहे. म्हणजेच विषयाचा उपभोग असे पर्यंत आनंद तो संपला की भोग दुःखाचा !

उदाहरणार्थ - येथील प्रत्येक वस्तू क्षणाक्षणाला बदलत असते. आज गोजिरवाणी दिसणारी कळी कायम कळीच रहात नाही. तिचे नकळत टवटवित फूल बनते. ते फूल कळीपेक्षाही सुंदर आणि मनाला आल्हाद देणारे वाटत असले तरी कळीची वाढ तिला विनाशाकडे नेणारीच असते. कारण ते फूल ! फूल या स्वरूपात फार काळ राहू शकत नाही. दोन चार दिवस साऱ्या जगाला आपल्या मंद सुवासाने आल्हाद दिल्यानंतर त्याची एक मखमाली पाकळी जमिनीवर अलगद पडू लागते नि लवकरच पडलेल्या पाकळ्यांचे निर्माल्य बनते आणि वाऱ्याबरोबर त्या सुखाला घेऊन उडून जातात.

या जगातील यच्चयावत् वस्तू जर नाशवंत आणि अंतर्यामी दुःख देणाऱ्या आहेत तर शाश्वत सुख देणारी एकही गोष्ट नाही का ? या संदर्भात स्वामी विवेकानंद म्हणतात, ' आपल्याला सुख आणि दुःख दोन्हीही नकोत. कारण आपल्याला त्याही पलीकडची अवस्था गाठावयाची आहे. आपल्याला सुखदुःखातीत व्हायचे आहे. म्हणजेच आपल्याला आत्म्याची जाणीव प्राप्त करुन घ्यावयाची आहे. खरे तर आत्मा आपल्यातच आहे याची जाणीव आपल्याला अज्ञाने होत नाही. या अज्ञानाचा पडदा दूर सारला की आपल्याला आत्म्याची जाणीव होते. आणि हा अज्ञानाचा पडदा नामःस्मरणाने सहज दूर करता येतो. अशाप्रकारे एकदा आत्मस्वरुपात सुप्रतिष्ठित झाल्यानंतर आपण अन्य कशावर अवलंबून रहात नाही याची जाणीव झाल्यावर मग आपण शास्वत सुख अनुभवू शकतो.

परंतु आत्मप्राप्ती कशी करून घ्यावयाची ? आत्मप्राप्ती ही बाजारात विकत मिळणारी गोष्ट नव्हे. मानवी व्यक्तीमत्त्वाचा पूर्ण विकास केवळ आत्मज्ञानानेच होतो. एकदा याज्ञवल्क्य ऋषिंनी संन्यासाश्रम ग्रहण करण्याचे

---

ठरविले. त्यावेळी आपली पत्नी मैत्रेयीला म्हणाले, ' आता माझ्याजवळ असलेल्या धनाचा काही भाग तुला देतो.' त्यावर मैत्रेयीने उत्तर दिले, 'धनाने भरलेली पृथ्वी मिळाली तरी मला आत्मज्ञान होईल का ? धन देण्यापेक्षा मला आत्मज्ञान प्राप्त करून घेण्याचा मार्ग सांगा. तेव्हा त्यांनी तिला - 'आत्मा वा अरे दृष्टव्यः श्रोतव्यः मन्तव्यः निदिध्यासतव्यः ।' अशा अर्थाचा उपदेश केला. याचा थोडक्यात अर्थ असा की 'मनुष्याने आत्मज्ञानप्राप्तीसाठी त्या संबंधी श्रवण, मनन व चिंतन केले पाहिजे.'

आपणाला आत्मज्ञान नसल्यानेच आपण अनेक प्रकारच्या मोहात, दुःखात आणि बंधनात अडकतो. स्व-स्वरुपाची जाणीव नसल्यानेच आपण सुख दुःखाच्या चक्रात फिरत असतो. पण आत्मज्ञान प्राप्त झाल्यानंतर आपण आनंदरुप होतो व आपणाला शाश्वत सुखाची जाणीव होऊ लागते, आणि ही जाणीव प्राप्त झाल्यावर

हे विश्वची माझे घर । ऐसी मती ज्याची स्थीर ।

किंबहूना चराचर । आपणाची जाहला ॥

अशा उच्च अवस्थेत आपण जाऊन पोहोचतो. यालाच पूर्णत्व म्हणले जाते. आणि या पूर्णत्वाच्या स्थितीला पोहोचणे हे उपासनेमागचे अंतिम ध्येय दत्तसंप्रदायात सांगितले आहे.

स्वामीन तव शरणम् । स्वामीन् तव शरणम् ।

**श्री. सुरेंद्र शं. हिर्लेकर**
५, श्रमसफल सोसायटी,
विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - २
दूरध्वनी : ५४० ४३ १६

• • •

Best Wishes

Shree Printers

Commercial Printers

"Yashodeep"
Near Haridas Wadi,
Thane (E) 400 603.

हार्दिक शुभेच्छा !

आमच्या येथे घरगुती स्वरुपाची सर्व प्रकारची लोणची, पापड, मसाले, चटण्या, भाजण्या (उपवास भाजणी, थालीपीठ भाजणी, चकली भाजणी) पोहा डांगर, मेतकूट, अनरसा पीठ, तयार चिवडा, चकल्या, मिरगुंड, सुवासिक मोदकांचे पीठ मिळेल.

तसेच सर्व प्रकारची दळणे दळून मिळतील.

*संपर्कासाठी पत्ता.*
**सौ. निलांबरी नारायण पेंडसे**
सिता सदन को.ऑप.हाऊ. सोसायटी,
तळमजला, खो. क्र. ४, सामंतवाडी,
उथळसर नाका, ठाणे (पश्चिम)
फोन : ५४७८१४६ / ५३६७७७८

# कुमार कला केंद्र

**सौ. ज्योती जोशी**

कुमार कला केंद्रातर्फे घेण्यात आलेल्या यंदाच्या आंतरशालेय एकांकिका व लोकनृत्याच्या स्पर्धांमध्ये सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळेची चार नाटके दिनांक १-१०-९९ रोजी सकाळी १० वाजल्यापासून ठाण्याचे एकमेव भूषण असलेले गडकरी रंगायतन येथे घेण्यात आली.

पहिलेच नाटक हे शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे 'मानसी तुझ्यासाठी' श्री. संजय बोरकर यांनी लेखन, दिग्दर्शन आणि नेपथ्य केलेल सादर करण्यात आले. ह्या नाटकाचे संगीत शाळेच्या एक शिक्षिका सौ. वीणा जोशी व भास्कर पळणीटकर यांचे होते. सध्याच्या दूरदर्शन संस्कृतीचा आई वडील कामावर गेल्यावर कामवालीकडे सोपविल्या गेलेल्या मानसी नावाच्या एका भावनाप्रधान अशा मुलीच्या कोवळ्या मनावर किती भयानक परिणाम होतो याचे दुःष्परिणाम दाखविणारे असे हे नाटक होते.

मानसीचे काम करणारी कु. आसावरी अभ्यंकर व तिची आई झालेली सौ. प्रियंका भांगले या दोघींचेही अभिनय अप्रतिम होते. मानसीचा आपल्या डोक्यावर परिणाम झाल्याचा अभिनय तर खरोखर दाद देण्यासारखा होता तर तिच्या आईचा आपल्या मुलीच्या डोक्यावर परिणाम झाल्यावर जिवाची होणारी घालमेल दाखविणारा अभिनय असाच तोला मोलाचा होता. इतर पात्रांमध्ये डॉ. झालेल्या अपर्णा भोळे यांनी खरोखर डॉ. ह्या व्यक्तिरेखेशी अभिप्रेत असलेली शांत परंतु कसबी अशी भूमिका छाप पाडून गेली. इतर शिक्षिका मुख्याध्यापिका तसेच मानसीच्या घरातील कामवालीबाई व आजी अनुक्रमे कु. किर्ती कटार, सौ. मनाली देवधर, सौ. ऊला पाटील, सौ. मैत्रेयी शेवडे व इतर वर्गातील बाल कलाकारांनी पण हे नाटक यशस्वीपणे सादर करण्यास साथ दिली. दूरदर्शन बद्दलचा एक जबरदस्त विचार पालकांना देऊन लिहिलेल्या या नाटकाचे कलाकारांनी सोने केले. त्यांच्या कामाबद्दल कुमार कला केंद्रातर्फे आसावरी अभ्यंकर, सौ. प्रियंका भांगले, सौ. अपर्णा भोळे व कु. वीणा कटारी यांनी प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला.

वरील नाटकाचे भाव मनातून होता होताच 'महाराजांचे नवीन कपडे' हे पूर्व प्राथमिकच्या इटुकल्या पिटुकल्याचे स्वतः त्यांच्या एक शिक्षिका सौ. विशाखा देशपांडे यांनी लेखन व दिग्दर्शन केलेल्या नाटकाचा प्रयोग सादर केला. यामध्ये अगदी तलम वस्त्र विणून देतो अशी थाप मारुन राजाचे कपड्याबद्दल वेड कमी करण्याची किमया या नाटकात दाखविण्यात आली होती. त्यात असलेल्या सर्व २८ बाल कलाकारांनी आपल्या सुंदर व सहज केलेल्या अभिनयाने सर्व प्रेक्षकांची मने जिंकली. या सर्व बालकलाकारांचा प्रशस्तीपत्रके देऊन गौरव करण्यात आला.

पूर्व प्राथमिक नाटकानंतर मध्यंतरामध्ये कुमार कला केंद्रातर्फे ज्या आंतरशालेय एकांकिका व लोकनृत्य स्पर्धा झाल्या त्यांच्या परिक्षकांचा व इतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. ह्या वेळी उपस्थित असलेले विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. टिळू यांनी कुमार कला केंद्राचे संचालक श्री. अरविंद वैद्य हे प्रकृती अस्वास्थ्य असूनही करत असलेल्या या स्पर्धांच्या आयोजनाचे कौतुक करुन त्यांच्या उपस्थितीला दाद दिली. ते करीत असलेल्या नाट्यसेवेच्या जिद्दीपुढे विद्या प्रसारक मंडळ स्पर्धा आयोजित करण्यासाठी देत असलेल्या खोल्यांचे अप्रूप काहीच नाही असे आपल्या भाषणात त्यांनी सांगितले. कारण या संबंधात श्री. वैद्य यांनी त्यांच्या भाषणात विद्या प्रसारक मंडळाने खोल्या उपलब्ध करुन दिल्याबद्दल

ज्या पायांवर माथा ठेवावा असे पाय फक्त आईलाच असतात.

आवर्जून गौरवोद्गार काढले होते.

मध्यंतरानंतर सौ.आ.के.जोशी इंग्रजी माध्यम शाळेच्या प्राथमिक विभागाच्या सौ. हर्षदा संजय बोरकर यांनी लिहिलेल्या व श्री. संजय लक्ष्मण बोरकर यांनी दिग्दर्शन व नेपथ्य केलेल्या व सौ. वीणा जोशी यांचे संगीत लाभलेल्या 'ब्रेक के बाद' या एकांकिकेचा प्रयोग झाला. या मधे दूरदर्शन वर दिसणाऱ्या जाहिरातीचा बालमनावर काय परिणाम होतो व मुले जाहिराती हावभावासहित तोंडपाठ करून त्याच्याशी कसे एकरूप होतात. 'शक्तीमान' सारख्या मालिकांचा बालमनावर होणारा भीषण परिणाम तर आपण वर्तमानपत्रातून वाचला आहे. परंतु अजूनही मुलांपेक्षा त्यांच्या पालकांनाच आपल्या मुलाने दूरदर्शनवर एखाद्या जाहिरातीत किंवा मालिकेत चमकणे याचे महत्व फार वाटते व त्या दृष्टीने त्यांच्या अभ्यासाच्या किंवा खेळण्या-वागण्याच्या काळाचा विचार न करता मुलांना या अशा मालिकांसाठी वा जाहिरातींसाठी प्रोत्साहन दिल्याने जीवनाचे काय नुकसान होते हे या एकांकिकेत दाखविले. त्यातील जाहिरात गाजवणारे चिंटू-पिंटू म्हणजे कु. ऋषभ ठक्कर व कु. अभिलेष गोखले यांचे फक्कड अभिनय, तर प्रसिद्धीच्या मागे लागलेल्या त्यांची आई रुपा कु. रिचा टिपणीस, संयमी व शांत बाबांचे काम कु. मिहीर देवधर व त्यांची सालस मुलगी कु. नंदिनी बोरकर यांची कामे अजोड होती. या पांचानाही प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

त्यानंतर सादर करण्यात आलेले लेखिका व दिग्दर्शिका सौ. हर्षदा संजय बोरकर यांचे 'प्रिय बाबांस' ही माध्यमिक विभागाची एकांकिका सादर करण्यात आली. कारगिलच्या युद्धावर आधारित अशा या एकांकिकेत लेखिकेने ज्याच्या घरचे वडील हे प्रत्यक्ष युद्धावर आहेत त्या मुलाला हरघडी येणारी आपल्या बाबांची आठवण व त्याच बरोबर ते आपल्याशी खेळावयास किंवा आपल्या घरोबर नाहीत याची खंत मनाला किती असते याचे विदारक चित्रण या एकांकिकेत या लेखिकेने केले आहे. अशामुळे त्या मुलाच्या मनावर परिणाम होतो. तो सैन्यातील प्रत्येक माणसाविषयी कटूतेने बोलत असतो, त्याची आई, त्याचे मित्र-मैत्रिणी, आणि त्याची एक प्रेरणाताई, जी वारंवार त्याला समजावून देऊनही त्याच्यात बदल घडून येत नाही. तो ते मानावयास तयार नसतो. कारगिलच्या संघर्षानंतर जवानांच्या कुटुंबियांना जमविण्यात येणाऱ्या मदतीचे आव्हान करीत असताना, त्याच्या मनावर शत्रूने आपल्या सैनिकांवर केलेल्या अत्याचाराचा परिणाम होतो. सध्याच्या युद्ध जन्य परिस्थितीमध्ये या नाटकांचा प्रेक्षकांच्या मनावर खोल ठसा उमटून गेला. नाटकातील सर्वांची कामे अप्रतिम होती. मदत गोळा करित असताना वडील धारातीर्थ पडल्याची तार येते. त्या नंतर त्यांना देण्यात येणाऱ्या शौर्यपदकाचा स्वीकार करताना त्याच्या मनात वडीलांच्या शौर्याबद्दल अभिमान निर्माण होतो व त्यानंतर तो मातृभूमीसाठी सैन्यात जायला तयार होतो.

एकांकिकेचे दिग्दर्शन त्याला साजेसे गंभीर वातावरणाचे होते. नेपथ्य श्री. संजय बोरकर यांचे होते. समीरची भूमिका करणाऱ्या अजिंक्य काळे, आई झालेली प्रियांका नाबर व प्रेरणाताई झालेली कु. प्रिया मराठे , सर्वेश परांजपे-मित्र यांची कामे खरोखरीच वाखणण्यासारखी होती. या सर्वांना प्रशस्तीपत्रके देऊन गौरविण्यात आले.

लहान लहान मुले एखाद्या कसलेल्या कलावंतासारखी कामे करताना पाहून कौतुकाने उर भरुन येतो व त्यामुळे कुठल्या एकांकिकेला प्रथम बक्षिस मिळेल याबद्दल मनात संभ्रम निर्माण होतो. कारण सर्व एकांकिका एका पेक्षा एक सरस होत्या. ज्यावेळी कुमार कला केंद्राने त्यांचा निकाल (सोबत जोडला आहे.) जाहीर केला त्यात सौ.आ.के.जोशी इंग्रजी माध्यम शाळेला मिळालेली बक्षीसे बघून अभिमानाने विद्या प्रसारक मंडळ व शाळेची मान ताठ झाली.

• • •

---

आईला प्रदक्षिणा घातली तर विश्वप्रदक्षिणेचे पुण्य मिळते.

# कुमार कला केंद्र

## ३५व्या आंतरशालेय एकांकीका स्पर्धा १९९९-२०००

## -: अंतिम निकाल :-

## पूर्व प्राथमिक विभाग (मुंबई-ठाणे एकत्र)

सर्व प्रथम शाळा: सौ.ए.के.जोशी (इं.मि.प्रि.स्कूल, ठाणे) एकांकिका : महाराजांचे नवीन कपडे

उत्कृष्ट अभिनेता : तेजस कोपरकर एकांकिका : महाराजांचे नवीन कपडे

शाळा : सौ.ए.के.जोशी (इं.मि.प्रि.स्कूल, ठाणे)

उत्कृष्ट शिक्षक व लेखक : सौ. विशाखा देशपांडे एकांकिका : महाराजांचे नवीन कपडे

शाळा : सौ.ए.के.जोशी (इं.मि.प्रि.स्कूल, ठाणे)

उत्कृष्ट शिक्षक दिग्दर्शक : सौ. विशाखा देशपांडे एकांकिका : महाराजांचे नवीन कपडे

शाळा : सौ.ए.के.जोशी (इं.मि.प्रि.स्कूल, ठाणे)

## प्राथमिक विभाग (मुंबई-ठाणे एकत्र)

सर्व प्रथम शाळा : विद्याप्रसारक मं.(प्राथ. विभाग-दहिसर) एकांकिका : जंतर मंतर पोरं छिलंदर

सर्व द्वितीय शाळा : के.एम.एस.परेल प्रा.स्कूल एकांकिका : बंद चॅनेल

उत्कृष्ट अभिनेता : रोहित गुरव शाळा : के.एम.एस.परेल प्रा.स्कूल एकांकिका : बंद चॅनेल

उत्कृष्ट अभिनेत्री : गायत्री लेले एकांकिका : जंतर मंतर पोरं छिलंदर

शाळा : विद्याप्रसारक मं.(प्राथ. विभाग-दहिसर)

उत्कृष्ट शिक्षक लेखक : हर्षदा बोरकर एकांकिका : ब्रेक के बाद

शाळा : सौ.ए.के.जोशी (इं.मि.प्रि.स्कूल, ठाणे)

उत्कृष्ट शिक्षक दिग्दर्शक : सीमा विठाणे

शाळा : के.एम.एस.परेल प्रा.स्कूल एकांकिका : बंद चॅनेल

## माध्यमिक विभाग (मुंबई-ठाणे एकत्र)

सर्व प्रथम शाळा सौ.ए.के.जोशी (इं.मि.प्रि.स्कूल, ठाणे) एकांकिका : प्रिय बाबांस

सर्व द्वितीय शाळा :ज.ए.इं.चे सुभेदारवाडा, कल्याण एकांकिका : आम्हालाही न्याय हवायं

उत्कृष्ट अभिनेता : रोहित सखदेव शाळा :ज.ए.इं.चे सुभेदारवाडा, कल्याण एकांकिका : आम्हालाही न्याय हवायं

उत्कृष्ट अभिनेत्री : श्वेता पटे शाळा :ज.ए.इं.चे सुभेदारवाडा, कल्याण एकांकिका : आम्हालाही न्याय हवायं

शाळा : सौ.ए.के.जोशी (इं.मि.प्रि.स्कूल, ठाणे)

उत्कृष्ट शिक्षक व लेखक : हर्षदा संजय बोरकर एकांकिका :प्रिय बाबांस

शाळा : सौ.ए.के.जोशी (इं.मि.प्रि.स्कूल, ठाणे)

उत्कृष्ट शिक्षक दिग्दर्शक : हर्षदा संजय बोरकर एकांकिका :प्रिय बाबांस
शाळा : सौ.ए.के.जोशी (इं.मि.प्रि.स्कूल, ठाणे)

## शिक्षक विभाग (मुंबई-ठाणे एकत्र)

सर्व प्रथम शाळा सौ.ए.के.जोशी (इं.मि.प्रि.स्कूल, ठाणे) एकांकिका : मानसी तुझ्याच साठी

उत्कृष्ट अभिनेता : संतोष पाटील एकांकिका : आयुष्याची पून्हा पेटली मशाल
शाळा :श्रमिक विद्यालय, जोगीश्वरी

उत्कृष्ट अभिनेत्री : प्रियंका भांगले एकांकिका : मानसी तुझ्याच साठी

शाळा : सौ.ए.के.जोशी (इं.मि.प्रि.स्कूल, ठाणे)

उत्कृष्ट शिक्षक व लेखक : संजय बोरकर एकांकिका :मानसी तुझ्याच साठी

शाळा : सौ.ए.के.जोशी (इं.मि.प्रि.स्कूल, ठाणे)

उत्कृष्ट शिक्षक दिग्दर्शक : हर्षदा संजय बोरकर एकांकिका :मानसी तुझ्याच साठी

शाळा : सौ.ए.के.जोशी (इं.मि.प्रि.स्कूल, ठाणे)

उत्कृष्ट शिक्षक दिग्दर्शक : सौ. स्मिता चव्हाण एकांकिका : आयुष्याची पून्हा पेटली मशाल
शाळा :श्रमिक विद्यालय, जोगेश्वरी

डेझी दादरकर पारितोषिक : प्रियांका भांगले

शाळा : सौ.ए.के.जोशी (इं.मि.प्रि.स्कूल, ठाणे)

• • •

दिवसाची सुरुवात आईच्या चरणांना स्पर्श करुन करावी.

# जानेवारी २०००

सौ. विशाखा देशपांडे

या शतकातील अखेरच्या वर्षात आपण पदार्पण करून नवीन सहस्त्रकाचं स्वागत करण्या करता संपूर्ण मानव समाज जणू नवीन आव्हानांना हसत तोंड देण्यासाठी दोन्ही हात पसरून सज्ज आहे. सगळं जगच नव्या नवरी प्रमाणे साज श्रृंगार करून नटून थटून नव्या अनुभवांना सामोरं जाण्यासाठी या अखेरच्या वर्षाची पायरी चढून नव्या शतकाचा उंबरठा ओलांडयाची वाट पहातंय. नव्या दिशा!! नवे आभाळ !! नवे क्षितीज !!! विद्यार्थी मित्रांनो ! हे नवीन आव्हान तुम्हाला खुणावतंय पुढील शतकात निर्माण होणार आहेत, तुमच्या मधूनच महान शास्त्रज्ञ, साहित्यिक, वैमानिक, डॉक्टर, अभिनेते आणि बरेच काही. तुम्ही तुमचं सौभाग्य समजा की तुम्हाला पुढील अनेक गोष्टी सोप्या करून देण्यासाठी तुमच्या मागील पिढ्यांनी प्राण पणाला लावून काम केले. त्यांच्या या कामातून प्रेरणा घेऊन तुम्हीही निर्माण करा, यशाचं उंच शिखर गाठणारा एक चैतन्यमय नवा समाज. या नव्या शक्तिनिशी सज्ज व्हा आणि सांगा ठामपणे जगाला-

*अनंत आमुची ध्येयासक्ति,*
*अनंत अन् आशा*
*किनारा तुला पामराला ॥*

तुम्हा सर्वांना नवीन सहस्त्रकांसाठी व नवीन वर्षासाठी हार्दिक शुभेच्छा देऊन सादर करत आहे ही परिसर वार्ता-

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालय :**

दिनांक ७ डिसेंबर ९९ रोजी, बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील गणिताचे वरिष्ठ प्राध्यापक श्री. सतीश कृष्ण धर्माधिकारी यांचे अचानक हृदय विकाराने निधन झाले. त्यांच्या या आकस्मिक निधनाने महाविद्यालयात शोककळा पसरली होतो. त्याच दिवशी त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी महाविद्यालयात शोकसभा आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी प्राचार्य सौ.जी. पाटील, उपप्राचार्य डॉ. सौ.म. सारंग, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. २ मिनिटे स्तब्धता पाळून सर्वांनी श्री.धर्माधिकारी यांना श्रद्धांजली वाहिली. या प्रसंगी प्रा. पोतदार व श्री. श्रीराम जाधव यांनी श्री. धर्माधिकारांच्या आठवणींना उजाळा दिला.

त्यांच्या आत्म्यास शांती लाभो ही प्रार्थना.

**विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन :**

**आय.एस्.टी.ई. विद्यार्थी विभाग :**

'इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन' ही तांत्रिक शिक्षणाशी संबंधीत असलेली संस्था आहे. आपले तंत्रनिकेतन हे त्याचे विद्यार्थी विभागाचे सभासद आहेत. सुमारे २२० विद्यार्थ्यांनी याचे सभासदत्व घेतले आहे. या विद्यार्थी विभागाचे उद्घाटन दिनांक १६ सप्टेंबर ९९ रोजी, जे.जे. स्कूल ऑफ आर्टसचे प्राचार्य श्री. विजय जोशी यांच्या हस्ते झाले.

पूर्वीचे 'मॉडर्न कम्युनिकेशन टेक्निकस्' या विषयावर त्यांनी व्याख्यान दिले व विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले.

प्रा. मुजुमदार, यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन हा कार्यक्रम यशस्वी करण्यास मदत केली. आय.एस्.टी.ई. च्या कार्यवाह सौ.उषा राघवन यांनी मुलांना या संस्थे बद्दल माहिती दिली.

## विद्या प्रसारक मंडळाची भावे राष्ट्रीय व्याख्यानमाला

विद्या प्रसारक मंडळ १९७१ पासून प्रतिवर्षी भावे राष्ट्रीय व्याख्यानमाला आयोजित करीत असते. अलिकडेच संपन्न झालेल्या यंदाच्या व्याख्यानमालेत पहिल्या दिवशी निवृत्त न्यायाधीश लघुवाद न्यायालय, मुंबई श्री. श्रीनिवास बळवंत बेळवी यांचे ''लोकमान्य टिळकांनी दिलेले न्यायालयीन लढे'' तर दुसऱ्या दिवशी ठाण्यातील प्रसिद्ध समाजसेविका लीलाताई जोशी यांचे ''मानवी हक्कांची वाटचाल-आम्ही स्त्रिया'' या विषयावर उद्बोधक भाषण झाले.




### पहिला दिवस (२४-११-१९९९)

पहिल्या दिवशी 'लोकमान्यांनी त्यांच्या जीवनात लढविलेले न्यायालयीन लढे' या विषयावर बोलताना न्यायाधीश श्रीनिवास बेळवी यांनी ताईमहाराज प्रकरणापासून ते शेवटच्या लढ्यापर्यंत लोकमान्य टिळकांना कसे झगडावे लागले त्याचे सुबोध विवेचन आपल्या व्याख्यानात केले. टिळकांच्या आयुष्यात अनेक प्रकरणे होती त्यातील हे न्यायालयीन लढ्यांचे प्रकरण एक आहे असे सांगून श्री. बेळवी यांनी टिळकांना वेळोवेळी मदत करणारांनी ती कशी केली व काही जणांनी टिळकांना कसा त्रास दिला त्याचा साद्यंत इतिहास त्यांनी कथन केला. न्यायमंदिरात लोकमान्य टिळक हे त्यांचे पुस्तक असून त्याचे इंग्रजी भाषांतरही त्यांनी केले आहे.

या दिवशीच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्या प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. मा.य. गोखले यांनी केले तर श्री. बेळवी यांचा परिचय मंडळाचे उपाध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर यांनी करून दिला. मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. अ.धों. टिल्लू यांनी आभारप्रदर्शन केले.




पहिल्या दिवशीच्या व्याख्यानास संस्थेचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर अध्यक्षस्थानी होते. त्यांच्या भाषणाने समारंभाचा समारोप झाला. या दिवशीच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विज्ञान महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. मोहन पाठक यांनी केले.

### दुसरा दिवस (२५-११-१९९९)

दुसऱ्या दिवशी समाजात स्त्रियांना पदोपदी वाईट वागणूक मिळते व पुरुषप्रधान संस्कृती त्यांचे हक्क कसे हिरावून घेते याबद्दल अतिशय अंतर्मुख करणारे विवेचन करून श्रीमती लीलाताई जोशी यांनी स्त्री जीवनातील समस्यांचा वेध घेतला. स्त्रियांच्या प्रश्नांबाबत प्रत्यक्ष काम करताना आलेल्या अनुभवांचे दाखले त्यांनी दिले.

---

मुलाला जन्मतःच भेटणारी जगातील पहिली व्यक्ती म्हणजे आई.






या दिवशी कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष व मंडळाच्या 'दिशा' या नियतकालिकाचे संपादक श्री. अ.धों. टिळ्ळू यांनी केले. कार्यक्रमाच्या वक्त्या श्रीमती लीलाताई यांचा परिचय सौ. मंजिरी दांडेकर यांनी करुन दिला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी माजी निवृत्त न्यायाधीश श्री. राजाभाऊ गवांदे होते. त्यांच्या हस्ते दिशा मासिकाच्या दिवाळी अंकाचे प्रकाशन संपन्न झाले. त्यांचा परिचय प्रा. मोहन पाठक यांनी करून दिला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. गवांदे यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत स्त्रियांवरील अन्यांयाचा ओझरता निर्देश केला. विद्या प्रसारक मंडळाच्या 'दिशा' बद्दल त्यांनी अतिशय चांगले उद्‌गार काढले. या दिवशी व आदल्या दिवशी डॉ. बेडेकरांच्या हस्ते पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले.

दुसऱ्या दिवशी समारोप मंडळाचे उपाध्यक्ष श्री. श्री.वि. करंदीकर यांनी केलेल्या ऋणानिर्देशाने झाला. या दिवशी सूत्रसंचलन श्री. रविंद्र मांजरेकर यांनी केले.

दोन्ही दिवशी स्वागतपर पद्य, पहिल्या दिवशी वंदे मातरम् तर दुसऱ्या दिवशी पसायदान आनंदीबाई जोशी विद्यालयातील संगीत शिक्षिका सौ. वीणा जोशी यांनी अतिशय सुरेल आवाजात सादर केले.

कार्यक्रमाच्या दोन्ही दिवशी भावे कुटुंबियांच्या वतीने श्री. वसंतराव भावे व सौ. भावे कार्यक्रमास उपस्थित होत्या. विद्या प्रसारक मंडळाकडे ठेव म्हणून ठेवलेल्या रकमेत यंदा अकरा हजार रुपयांची भर श्री. भावे यांनी घातली.



दोन्ही दिवशीच्या व्याख्यानांना विद्या प्रसारक मंडळाच्या कार्यकारिणीचे सदस्य, बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सी.जी. पाटील, डॉ. बेडेकर विद्या मंदिरचे मुख्याध्यापक श्री. सहस्त्रबुद्धे,.सौ. कालिंदी कोल्हटकर, मराठी व इंग्रजी प्राथमिक आणि पूर्व प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापिका, मंडळाच्या शाळांमधील शिक्षक व नागरिकांची उपस्थिती चांगली होती.

• • •

आईच्या दुधाची सर कोणत्याच दुधाला येत नाही.

**डॉ. बेडेकर विद्यामंदिर :**

प्रियदर्शनी स्पोर्टस् कॉम्लेक्स् येथे या संपूर्ण वर्षात निरनिराळ्या वेळी झालेल्या कराटे स्पर्धे मधे कुमार मयुर प्रशांत वर्मा याने नेत्रदिपक यश मिळवले असून त्याची '१० व्या कुवाटो विश्वकप कराटे चॅम्पीयनशिप २०००' या स्पर्धे साठी निवड झाली आहे. ही स्पर्धा ओरिएन्टल कॉलेज, लॉस एंजलिस, अमेरिका येथे जुलै २००० मधे आयोजित करण्यात आली आहे.

मयूर यास प्राप्त झालेली पदके खालील प्रमाणे.

☆ २१ फेब्रुवारी ९९ रोजी '४थी फुनरोसी कप इन्टरनॅशनल कराटे चॅम्पियनशिप' स्पर्धेत, काटा या प्रकारासाठी रौप्य पदक.

☆ २३ ऑगस्ट ९८ रोजी काटा या प्रकारासाठी प्रशस्ती पत्रक.

☆ २९ ऑगस्ट ९९ रोजी '५वी ऑल इंडिया कुवाटो कप' कराटे चॅम्पियन स्पर्धेत-रजत पदक, काटा स्पर्धेत व रौप्य पदक, कुमटे या स्पर्धेत.

☆ ५ सप्टेंबर ९९ रोजी '८व्या वार्षिक फुदकोसी सुरकोन' चॅम्पियनशिप स्पर्धेत कुमटे प्रकारासाठी कास्य पदक.

मयूर यास 'दिशा' तर्फे हार्दिक शुभेच्छा!

**सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्लिश मिडियम स्कूल. प्राथमिक विभाग :** श्री. वत्स बालमंदिरमनी आयोजित केलेल्या संस्कृत श्लोकपठण व संस्कृत कथाकथन स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांना यश मिळाले.

<u>इ.१ली व २ री कथाकथन</u>

| | |
|---|---|
| अभिलेष नितीन गोखले | प्रथम क्रमांक |
| आशय पळशीकर | |
| ऐश्वर्या वैसास | द्वितीय क्रमांक |
| स्फूर्ती पंडित | |

<u>इ. ३री व ४थी श्लोक पठण</u>

| | |
|---|---|
| सुरभी उदय नेने | प्रथम क्रमांक |

कथा कथन

| | |
|---|---|
| मिहीर महेश देवधर | प्रथम क्रमांक |
| कोरिषिणी पेंढरकर | द्वितीय क्रमांक |

**सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्लिश मिडियम स्कूल. माध्यमिक विभाग :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ यांच्या तर्फे राज्य स्तरीय ॲथलेटिक्स् स्पर्धा ११ डिसेंबर ९९ रोजी दादोजी कोंडदेव क्रिडाप्रेक्षागृहात आयोजित केल्या होत्या. या मधे खालील विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक व पदके मिळाली.

| | | |
|---|---|---|
| मिथिला राव | १०० मि. धावणे | प्रथम क्रमांक |
| | २०० मि. धावणे | द्वितीय क्रमांक |
| | लांब उडी | द्वितीय क्रमांक |
| मोहित खांडेकर | लांब उडी | द्वितीय क्रमांक |
| आयुष पटवारी | ५०मी. धावणे | द्वितीय क्रमांक |

वरील सर्व विद्यार्थ्यांचे 'दिशा' तर्फे हार्दिक अभिनंदन!

घंटाळी प्रबोधिनी संस्था, ठाणे यांच्या वतीने येथील सेंट्रल मैदानावर सुरु असलेल्या १४ वर्षाखालील उप उपांत्यफेरीत सौरभ गायकवाडने १४ चौकारांसह नाबाद शतक झळकावले. त्याने १२६ धावा केल्या. परंतु सौरभच्या कामगीरीने आपल्या संघास यश मिळू शकले नाही. वसंत विहार विरुद्ध झालेल्या या सामन्यात आपल्या संघाने ४३ षट्कात २३४ धावा केल्या तर वसंत विहार हायस्कूल ने ४३.२ षट्कात २५६ धावा काढून आपल्याला पराभूत केले.

• • •

नऊ महिने बाळाला पोटात बाळगून त्याचा भार आई सोसते.

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

# थोरले बाजीराव पेशवे सभागृह

३०० आसने, आधुनिक दृकश्राव्य यंत्रणा उपलब्ध,
प्रसन्न वातावरण, उपाहाराची व्यवस्था,
वहाने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा.

संपर्क

कार्यवाह,
विद्याप्रसारक मंडळ, ठाणे
**दूरध्वनी : ५४२ ६२७०**